
आर्थिक | राजकीय | सामाजिक घडामोडींचा धांडोळा...

२१ जानेवारी २०१२ | वर्ष २८ | अंक २०

# शेतकरी संघटक

स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावणाऱ्यांचे पाक्षिक

₹१०



# शेतीवर संक्रांत

कापसाचा एल्गार - गंगाधर मुटे

कर कर्जा नहीं देंगे, बिजली का बिल भी नहीं देंगे - ज्ञानेश्वर शेलार

शेतमाल बाजार : संप, कंप व दंभ - गिरधर पाटील

# शेतकरी संघटक
स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावणाऱ्याचे पाक्षिक

वर्ष २८ । अंक २० । २१ जानेवारी २०१२

**मूल्य : ₹ १०**

संपादक
**सुरेशचंद्र म्हात्रे**

कार्यकारी संपादक
**श्रीकांत उमरीकर**

सल्लागार संपादक
**डॉ. मानवेंद्र काचोळे**
**डॉ. गिरधर पाटील**

साहाय्यक संपादक
**ज्ञानेश्वर शेलार**

मुखपृष्ठ/अंक मांडणी
**श्रीकांत झाडे**

**वार्षिक वर्गणी : ₹ २०० केवळ**

**(टीप : वर्गणीदारांनी अंकांसंबंधी तक्रार असल्यास खालील पत्त्यावर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.)**
**संपर्क :** कार्यकारी संपादक, पाक्षिक शेतकरी संघटक, जनशक्ती वाचक चळवळ, २४४-समर्थनगर, औरंगाबाद-४३१००१-३१, फोन : ०२४०-२३४१००४.
ईमेल : shetkarisanghatak@gmail.com

● हा अंक मालक परदेशी मोहन बिहारीलाल यांच्यासाठी संपादक, मुद्रक, प्रकाशक म्हात्रे सुरेशचंद्र पी., मु.पो. आंबेठाण, ता. खेड, जि. पुणे ४१०५०१ यांनी उदय एंटरप्राईजेस, ७० सी, सर्व्हिस इंडस्ट्रीज टाऊन सेंटर, सिडको, औरंगाबाद ४३१००३ येथे छापून जनशक्ती वाचक चळवळ, 'पिनाक', समर्थनगर, औरंगाबाद-४३१००१-३१ येथे प्रकाशित केला. ● अंकाची प्रसिद्धी दर महिन्याच्या ६ व २१ तारखेला. ● अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# अंतरंग

जागरण
**कापसाचा एल्गार**
गंगाधर मुटे ........ ३

आजकाल
**कर कर्जा नहीं देंगे, बिजली का बिल भी नहीं देंगे**
ज्ञानेश्वर शेलार ........ ५

मुद्दा
**शेतमाल बाजार : संप, कंप व दंभ !**
गिरधर पाटील ........ ७

विचार
**खरे लोकप्रतिनिधी मिळणार केव्हा?**
**नव्या जगाला सामोरे जाणाऱ्या युवक, युवतींनो**
अमर हबीब ........ ८

कॉमन नॉन सेन्स
**दुराग्रहात फसलेला लोकपाल आणि टीमअण्णाचा गाडा**
**संघाने केला अण्णा संघ गारद**
सुधाकर जाधव ........ १०

मिरचीचं खळं
**जय हो पाध्ये**
बाबू सोंगाड्या ........ १५



**मा. शरद जोशी यांना देण्यात आलेल्या 'चतुरंग' प्रतिष्ठान जीवनगौरव पुरस्कार प्रसंगी प्रकाशित करण्यात आलेली 'दैनंदिनी २०१२'**
**यात मा. शरद जोशी यांचेवरील विविध विचारवंतांचे लेख संकलित करण्यात आले आहेत. पुस्तकाच्या निवडक प्रती संघटक कार्यालयात विक्रीसाठी उपलब्ध आहेत. मूल्य १५० रु.**

# घोषणांच्या हत्तींचे पुतळे कसे झाकणार?

उत्तर प्रदेश विधानसभांच्या निवडणुका मायावती सरकारने जागोजाग उभारलेल्या हत्तीच्या पुतळ्यांना बुरखे घालण्याचा आदेश निवडणूक आयोगाने दिला आहे. हा आदेश तातडीने लाखो रुपये खर्च करून अमलातही आणल्या गेला आहे. हत्तीसारखी प्रचंड गोष्ट झाकायची म्हणजे अवघडच काम. बरं हत्तीचा आकार असा की तो झाकला तरी कळून येणारच. मग, असा आदेश देण्याचं कारण काय? आणि जर निवडणूक आयोगाला खरंच अशीकाही तळमळ आहे, तर मग असे पुतळे उभारले जात असताना आयोगाने दुर्लक्ष का केलं? का निवडणूक आयोगाचं काम हे फक्त आचारसंहिता जाहीर करणे आणि निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर ती उठवणे इतक्या काळापुरतच आहे काय? या निमित्ताने निवडणूक आयोग आणि एकूणच आपल्या प्रशासनाचा आणि पर्यायाने भारतीय मानसिकतेचाच ढोंगीपणा उघड झाला आहे. झाकायची गरज तेव्हाच पडते जेव्हा आपल्याला थातूरमातूर जुजबी वरवरचं असं काहीतरी करायचं असतं. गेल्या कित्येक वर्षांपासून सर्वसामान्य मतदारांना भुलावण्यासाठी उठवळ घोषणा करण्याची विविध नेत्यांमध्ये आणि पक्षांमध्ये स्पर्धाच लागली आहे. कुणी दोन रुपयांत तांदूळ देत आहे, कुणी टीव्ही वाटतो आहे, कुणी मंगळसूत्र वाटतो आहे, फुकट वीज देतो असं म्हणतो आहे. हे सर्व पक्ष कधी ना कधी सत्तेवरती येऊनही गेलेले आहेत. या सगळ्यांची दखल निवडणूक आयोगाने आजपर्यंत कशा पद्धतीने घेतली आहे?

ज्या पक्षाने लोकानुरंजनाच्या घोषणा केल्या तो पक्ष सत्तेत आल्यावर त्यांचे पालन करतो काय? महाराष्ट्रामध्ये सुशीलकुमार शिंदे मुख्यमंत्री असताना शेतकऱ्यांसाठी फुकट वीज देण्याची घोषणा झाली. वीजबिल माफीच्या घोषणा झाल्या याचा परिणाम असा झाला- गेल्या दहा वर्षांत महाराष्ट्राचा वीज प्रश्न अतिशय गंभीर बनला. आजही या किचकट प्रश्नाला हात घालायचीही हिंमत कोणाला होत नाही. फुकट किंवा अल्प दरातील अन्नधान्याच्या घोषणेने तर मोठाच अनर्थ उभा राहिला आहे. आज राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनांसारख्या उठवळ योजनांमुळे शासकीय यंत्रणेवरती करोडो रुपयांचा बोजा पडत आहे आणि तरीही अपेक्षित परिणाम जराही दिसत नाही. या सगळ्या लोकानुयायी तसेच लोकानुरंजन असलेल्या योजना अजिबात व्यवहार्य नाहीत. यातून निवडणुकांपुरतं काही एक वातावरण तयार करता येतं; पण प्रत्यक्षात काडीचाही उपयोग होत नाही. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजनेमुळे सर्वत्र मजुरांची समस्या गंभीर बनली आहे. राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेमुळे शेतमालाची बाजारपेठ विचित्र कोंडीत सापडली आहे. सर्व शिक्षा अभियानामुळे शिक्षण क्षेत्रात नेमकं काय चालू आहे, हेच कळायला मार्ग नाही. पटपडताळणीच्या निमित्ताने एकट्या महाराष्ट्रात एक चतुर्थांश विद्यार्थी बोगस आढळले. अख्ख्या भारताची पटपडताळणी केली तर समोर येणारे चित्र जास्तच विदारक असेल, हे सांगायला ज्योतिषाची गरज नाही. वारंवार हे सिद्ध झालेलं आहे. या सगळ्या योजनांमुळे आपली अर्थव्यवस्था धोक्यात येते आहे. प्रगतीची आणि विकासाची वाट अरूंद होते आहे; पण आजही याचे कुणाला भान नाही. सोनिया गांधी यांनी जेव्हापासून संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारचे नेतृत्व करण्यास सुरुवात केली आहे. तेव्हापासून तर कल्याणकारी योजनांचा नुसता ऊत आला आहे. पंतप्रधान म्हणून ज्या मनमोहन सिंग यांची सोनिया गांधींनी निवड केली ते खरे तर अर्थक्षेत्रात नावाजलेले व्यक्तिमत्त्व. पी. व्ही. नरसिंहाराव पंतप्रधान असताना अर्थमंत्री म्हणून मनमोहन सिंग यांनी लक्षणीय कामगिरी बजावली होती. तेच आता पंतप्रधान म्हणून काम करत असताना आर्थिक आघाडीवर पूर्णपणे हतबल झालेले आढळून येतात. किंवा असेही म्हणता येईल- त्यांना हतबल व्हावे लागते आहे.



व्यवहारात न बसणाऱ्या लंब्याचवड्या योजना आणि त्यांच्या घोषणा यांमुळे मतदारांना भुलावले, असं होत नाही का? हा विषय खरं तर निवडणूक आयोगाकडे जायला पाहिजे. आचारसंहिता पाच-पंचेवीस दिवस लागू करून काहीच उपयोग होत नाही. चार वाजता आचारसंहिता लागू होणार असेल तर अगदी पावणेचार वाजेपर्यंत आमचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, विरोधी पक्ष नेते सगळेच्या सगळे विविध प्रकल्पांच्या कोनशिलांचे अनावरण करण्यात मग्न असतात. ही आचारसंहितेची थट्टा नव्हे काय? आणि जर अशी थट्टा सत्ताधारी आणि विरोधक दोघेही मिळून उडवत असतील, तर निवडणूक आयोग काय करणार आहे? खरं तर प्रश्न असा आहे, निवडणूक आयोगाला मनापासून काही करायची इच्छा आहे का काहीतरी केलं असे दाखवावयाचे आहे?

विविध योजनांच्या संदर्भात आणि कार्यक्रमांच्या बाबतीत कालबद्ध असे नियोजन करून ठेवायला हवे. कुठल्याही प्रकल्पाची घोषणा झोपेतून उठल्यासारखी राजकीय नेत्यांना करता येणार नाही, असे बघितले पाहिजे. देशाच्या विकासाच्या बाबतीत एक कालबद्ध कार्यक्रम आखून त्याप्रमाणे वाटचाल केली जावी यामध्ये निवडणूक आचारसंहितांचा कुठलाही अडथळा येऊ नये किंवा उलट असं म्हणता येईल. निवडणुकांना डोळ्यांपुढे ठेवून कुठल्याही पद्धतीच्या विकासकामांचे नियोजन केल्या जाऊ नये. ठरल्यावेळी आणि ठरल्या काळात दिलेल्या वेळापत्रकानुसार निवडणुका संपन्न व्हाव्यात त्यासाठी सर्व यंत्रणेने कार्यक्षमतेने काम करायला हवे. सर्वसामान्य जनतेनेही राज्यकर्त्यांची रंजनवादी घोषणांची मानसिकता व्यवस्थितपणे समजून घ्यायला हवी. कुठल्याही भूलथापांना बळी पडणारे आपण तितकेच दोषी असतोत. शिवाय हे सगळे आपल्याला मूळ विकास हेतूपासून दूर नेणारे असते हेही लक्षात घ्यायला हवे. लहान मुलाने चॉकलेट मागितले की ते लगेच देणे हे जसे बरोबर नाही, इतकी ही साधीसरळ गोष्ट आहे. तुमच्या मुलाच्या आरोग्याची जशी तुम्हाला काळजी असते, तशीच काळजी देशाच्या आरोग्याचीही वाटायला हवी. आणि आपण सामान्य जनतेनेच राजकीय नेत्यांनी देऊ केलेले चॉकलेट नाकारून त्यांची जागा त्यांना दाखवायला हवी. मायावतींनी उभारलेले स्वतःचे आणि हत्तींचे पुतळे झाकणं ही तुलनेने सोपी गोष्ट आहे; पण हे सर्वत्र मनामनांमध्ये उभे केलेले घोषणांच्या हत्तींचे प्रचंड पुतळे कोण आणि कसे झाकणार?

# कापसाचा एल्गार

**कापसाच्या शेतीचा व्यवसाय हातबट्ट्याचा झाला आहे, परिणामी कापूस उत्पादकांची स्थिती हलाखीची आहे, हे राज्यभर जनमानसाच्या मनावर बिंबवण्यात शेतकरी संघटनेला अमर्याद यश मिळाले आहे. कापूस उत्पादकांच्या मनात असंतोष खदखदत आहे, हे हेरून विरोधी पक्षांनाही कापसाच्या भावाच्या प्रश्नाचे भांडवल करून आंदोलने रेटण्याचा प्रयत्न करावा लागला. सत्ताधारी पक्षालाही कधी नव्हे ती हेकेखोर भुमिका सोडून दोन हजार कोटीचे पॅकेज जाहीर करण्याची घोषणा करावी लागली आणि हे सर्व घडले शेतकरी संघटनेने राज्यात अमरावती, नांदेड आणि हिंगणघाट येथे घेतलेल्या तीन कापूस उत्पादक परिषदांमुळे.**



गंगाधर मुटे



बऱ्याच वर्षानंतर यंदा कापसाच्या भावाचा प्रश्न पुन्हा एकदा मैदान गाजवून गेला. लागवडीखर्चात प्रचंड वाढ झाली त्या तुलनेत कापसाच्या भावात वाढ झाली नाही, त्यामुळे कापसाच्या शेतीचा व्यवसाय हातबट्ट्याचा झाला आहे, परिणामी कापूस उत्पादकांची स्थिती हलाखीची आहे, हे राज्यभर जनमानसाच्या मनावर बिंबवण्यात शेतकरी संघटनेला अमर्याद यश मिळाले आहे. कापूस उत्पादकांच्या मनात असंतोष खदखदत आहे, हे हेरून विरोधी पक्षांनाही कापसाच्या भावाच्या प्रश्नाचे भांडवल करून आंदोलने रेटण्याचा प्रयत्न करावा लागला. सत्ताधारी पक्षालाही कधी नव्हे ती हेकेखोर भुमिका सोडून दोन हजार कोटीचे पॅकेज जाहीर करण्याची घोषणा करावी लागली आणि हे सर्व घडले शेतकरी संघटनेने राज्यात अमरावती, नांदेड आणि हिंगणघाट येथे घेतलेल्या तीन कापूस उत्पादक परिषदांमुळे.

कापसाच्या आंदोलनाचे रणशिंग फुंकले गेले तेव्हा कापसाचे बाजारभाव होते ४४००/- रुपये प्रति क्विंटल. मागील वर्षांतील तीन-चार महिन्याचा काळ सोडला तर कायमच कापसाचे भाव प्रति क्विंटल ३०००/- च्या आतच राहिलेले आहेत. मागील दहा वर्षात कापसाला सरासरी २०००/- रुपये प्रति क्विंटल एवढे देखील भाव मिळाले नाहीत. कापासाच्या शेतीत भरून न निघणारी तूट आल्याने कापूस उत्पादक क्षेत्रात शेतकरी आत्महत्याचे प्रमाण प्रचंड वाढले; पण या आत्महत्त्यांची म्हणावी तशी दखल ना सत्ताधारी पक्षाने घेतली ना विरोधी पक्षाने. मनातील असंतोषाला त्वेषाची धार नसल्याने कापसाच्या भावाचे आंदोलनसुद्धा उभे राहू शकले नाही. एक गोष्ट स्पष्टपणे लक्षात घेतली पाहीजे की, मनात असंतोष असला म्हणजे मनुष्य सर्वस्व झोकून आंदोलनात उतरायला तयार होतोच, हे खरे नाही. आंदोलनास तयार होण्यासाठी मनात त्वेष आणि शत्रूपक्षाबद्दल चिड उत्पन्न व्हावी लागते.

ऑक्टोंबर २०१० मध्ये देशांतर्गत कापसाचे भाव ३०००/- पेक्षा कमी होते आणि अमेरिका, चीन, पाकिस्तानातील कापसाचे उत्पादनक्षेत्र घटल्याने व नापिकी अशा दुहेरी स्थितीमुळे जागतीक बाजारपेठेत अचानक प्रचंड तेजी यायला लागली होती. सरकारने जर कापसावर निर्यातबंदी लादली नाही तर कापसाला देशात प्रति क्विंटल ७०००/- ते ९०००/- रुपये मिळू शकतील, असे चित्र स्पष्ट व्हायला लागले होते. त्यामुळे शेतकरी संघटनेने खबरदार! कापूस निर्यातबंदी कराल तर...! अशी सरकारला तंबी देऊन जिल्हास्तरावर प्रतिकात्मक आंदोलन केले होते. शेतकरी संघटनेचा रेटा बघून कापसावर पूर्णतः निर्यातबंदी करण्याची सरकारची हिंमत झाली नाही; मात्र पूर्णतः निर्यात खुली करण्याऐवजी अंशतः निर्यातीला परवानगी देण्यात आली. अंशतः निर्यातीमुळे देशांतर्गत बाजारपेठेत चैतन्य आले आणि कापसाचे भाव रु. ७०००/- पर्यंत चढले.

रावेरी येथील २ ऑक्टोबर २०१० मधील सीतामंदीर लोकार्पण सोहळ्याच्या निमित्ताने प्रचारासाठी फिरताना जेव्हा कापसाच्या भावाचा मुद्दा निघायचा आणि सरकारने निर्यातबंदी केली नाही तर कापसाला ९०००/- प्रतिक्विंटल भाव मिळू शकतात, असे आम्ही शेतकऱ्यांना सांगायचो तेव्हा त्यांची प्रतिक्रिया मोठी विचित्र असायची. ३ हजाराची ऐवजी ९ हजार हा

आकडाच शेतकऱ्यांच्या काही केल्या पचनी पडेना. प्रथम तर आम्ही थापा मारत आहोत असे त्यांना वाटायचे पण त्यानंतरही आम्ही जोर देऊन सांगायचा प्रयत्न केला तर त्यांना ९ हजार रुपये भाव मिळू शकतील हा मुद्दा पटण्याऐवजी आमचे मानसिक संतुलन तर बिघडले नाही ना, अशी त्यांना शंका वाटायची. कापसाला ७, ८ किंवा ९ हजार भाव मिळू शकतात, ही गोष्टच त्यांच्या पचनी पडत नव्हती; पण प्रत्यक्षात कापसाला बाजारात प्रति क्विंटल सात ते साडे सात हजार रुपये भाव मिळण्याचा चमत्कार घडून आला मात्र कापूस उत्पादकांच्या आयुष्यात पहिल्यांदाच वाट्याला आलेला हा ऐतिहासीक आनंद फार काळ टिकला नाही. फेब्रूवारी २०११ मध्ये केंद्रसरकारने कापसावर निर्यातबंदी लादली आणि कापसाचे भाव ७००० रुपयांवरून ३००० रुपयांवर कोसळले. त्यामुळे आंतरराष्ट्रीय चढ्या भावाचा फायदा शेतकऱ्यांना व्हायची वेळ आली तेव्हा सरकार आडवे आले आणि शेतकऱ्यांचा घात केला. आता आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत मंदी आहे तर सरकार शेतकऱ्याला वाऱ्यावर सोडून हात झटकत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या मनातील असंतोष आणखी वाढून कापसाचे आंदोलन तीव्र होत जाईल यात शंका नाही.

थोडेसे विषयांतर

१८ ऑक्टोबर १९८४ ला हिंगणघाट येथील टाका ग्राउंडवर शेतकरी संघटनेची पहिली भव्य कापूस उत्पादक परिषद झाली होती. त्यावेळेस सरासरी २० वर्षे वय असलेले आम्ही; म्हणजे स्वत: मी, मधुसूदन हरणे, दत्ता राऊत, साहेबराव येडे, मंसाराम कोल्हे आणि पुंडलिक हुडे हातात गेरुच्या बादल्या आणि ब्रश घेऊन भिंती रंगवायचे काम करायचो. वयाने लहान असल्याने झाडलोट आणि सतरंज्या अंथरण्याची मक्तेदारीही आमच्याकडेच होती.

यंदा पुन्हा एकदा तब्बल सत्तावीस वर्षानंतर ऐतिहासिक हिंगणघाट नगरीच्या आणि शेतकरी संघटनेच्या या बालेकिल्ल्यात कापूस व धान उत्पादक परिषद आयोजित करण्याचा योग आला आणि एकेकाळी भिंती रंगवणाऱ्या कार्यकर्त्यांच्या खांद्यावरच या परिषदेचे आयोजन करून यशस्वी करून दाखविण्याची धुरा येऊन पडली, ही आमच्या आयुष्यातील सोन्याच्या अक्षराने लिहून ठेवावी अशीच वाटचाल आहे, असे मला वाटते.

शेतकरी संघटना संपली असा कायमचा घोषा लावणाऱ्यांना या परिषदेसाठी मैदानावर जमलेल्या दहा हजारापेक्षा जास्त शेतकऱ्यांनी उपस्थित राहून दाखवून दिले की, शेतकरी संघटना ही कधीही न संपणारी संघटना आहे. बत्तीस वर्षांच्या शेतकरी संघटनेच्या प्रवासात अनेक चढउतार आले असतील पण बत्तीस वर्ष एवढा प्रदीर्घ काळ कोटीकोटी शेतकऱ्यांच्या समस्यांसाठी लढणारी शेतकरी संघटना ही एकमेव संघटना आहे हेही या निमित्ताने सिद्ध झाले आहे.

शेतकरी संघटनेच्या टीकाकारांनी एक गोष्ट लक्षात घ्यायला हवी की, १९८० च्या सुमारास संपूर्ण देशभरात नवनव्या संघटना निर्माण होण्याचे आणि आंदोलनाचे पेवच फुटले होते. शिक्षकांचा संप, गिरणी कामगारांचा संप, आसामचे विद्यार्थी आंदोलन, बोडोलँडचे आंदोलन, खलीस्तानचे आंदोलन, काश्मीरचे आंदोलन या सर्व संघटना आणि त्यांचे आंदोलन केव्हाचेच संपून इतिहासजमा झालेले आहे. एवढेच नव्हे तर शेतीविषयातील डॉ. म. गो. बोकरेंचे आंदोलन, उत्तरप्रदेशातील महेंद्रसिंग टिकैतांचे किसान आंदोलनही केव्हाचेच संपले आणि सारे पडद्याआड गेलेले आहेत. आज त्यांच्या आंदोलनातील धग जाऊ द्या; पण राखसुद्धा शिल्लक उरलेली नाही. या साऱ्या बदलत्या काळाच्या प्रवाहात फक्त आणि फक्त केवळ शेतकरी संघटनाच बत्तीस वर्षे एवढा प्रदीर्घ काळ टिकून राहिली आहे. परिषदेला हजारो शेतकर्यांनी उपस्थिती दर्शवून शेतकरी संघटना संपली म्हणणाऱ्यांना चोख उत्तर देऊन सणसणीत चपराक हाणली आहे.

गेल्या १६ वर्षात २,५६,९१३ म्हणजे तब्बल अडीच लाख शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. ही सरकारी आकडेवारी आहे. सरकारी आकडेवारी नेहमीच फसवी असते. त्यामुळे प्रत्यक्षात शेतकरी आत्महत्यांचा आकडा ५ लाखापेक्षा जास्त असणार, हे उघड आहे. आजपर्यंत जेवढ्या आत्महत्या झाल्यात त्यांपैकी दोनतृतीयांश संख्येपेक्षा जास्त आत्महत्या कापूस उत्पादक प्रदेशात झालेल्या आहेत. आंध्रप्रदेश, छत्तिसगढ, मध्यप्रदेश, कर्नाटक आणि महाराष्ट्र या पाच राज्यात आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या सर्वात जास्त आहे कारण कापूस उत्पादक शेतकऱ्यांची संख्या याच राज्यात जास्त आहे. कापसाला योग्य भाव मिळत नसल्याने कापूस उत्पादक शेतकऱ्यांचे आयुष्य उद्‌ध्वस्त होते, जीवनात नैराश्य येते. सन्मानाने जीवन जगण्याचे सर्वच मार्ग बंद झाले की आयुष्याला सामोरे जाण्याची इच्छाशक्ती नष्ट होते आणि मग त्यातूनच काटक, कष्टाळू व मनाने कणखर असलेला शेतकरी नाईलाजाने गळफास किंवा विषाची बाटली पोटात रिचवून मृत्यूला कवटाळतो, ही विदर्भातील शेतकरी आत्महत्यांची वास्तविकता आहे.

दिवसेंदिवस शेतकरी आत्महत्यांचा प्रश्न गंभीर होत चालला आहे. तीन वर्षांपूर्वी केंद्र शासनाने पॅकेज जाहीर करूनही शेतकरी आत्महत्या थांबल्या नाहीत याउलट ज्या वर्षी केंद्र शासनाने पॅकेज जाहीर केले होते त्या वर्षी १७,३६८ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या होत्या मात्र ज्यावर्षी कापसाला ७००० रु. भाव मिळालेत त्या वर्षी शेतकरी आत्महत्यांचा आकडा १७,३६८ वरून खाली घसरून  वर आला म्हणजे  टक्के एवढा खाली घसरला.

शेतकरी आत्महत्या थांबवायच्या असतील तर कापसाला कमीतकमी ६००० रु. भाव मिळणे अत्यंत आवश्यक आहे. यावर्षी बियाणाचे भाव सव्वापटीने वाढले. रासायनिक खताचे भाव दुपटीने वाढले, मजुरांची मजुरी वाढली आणि कापसाचे भाव मात्र सात हजारावरून चार हजारावर आलेत. आज कापसाची वेचणी करायला प्रति क्विंटल ८०० ते १००० रुपये खर्च होतो. कोणत्याही हिशेबाने ४००० रुपयात क्विंटलभर कापूस विकणे परवडूच शकत नाही. कापसाला ६००० रुपये भाव मिळाला नाही तर कापूस उत्पादक क्षेत्रात नैराश्याचे वातावरण निर्माण होऊन पुन्हा एकदा शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण वाढल्याशिवाय राहणार नाही, हे सूर्यप्रकाशाएवढे स्पष्ट आहे.

आजवर लाखो शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्यात पण शेतकऱ्याचे मरण हेच ज्या सरकारचे धोरण आहे, त्या सरकारच्या शेतकरीविरोधी धोरणात काहीही बदल झालेला नाही, हे लक्षात घेणे आवश्यक आहे. ५-६ आतंकवादी हातात बंदूका घेऊन रस्त्यावर उतरल्याबरोबर माजघरात जाऊन लपणाऱ्या सरकारला आणि बायकोच्या पदराच्या आडोशाला दडणाऱ्या प्रशासनाला गरीब शेतकऱ्यावर मर्दुमकी गाजविताना कुठला अघोरी आनंद होतो, हे न सुटणारे कोडे आहे. शेतकऱ्याची आत्महत्या आणि आत्मग्लानीची भाषा शासन आणि प्रशासन या दोघांनाही अजिबातच कळत नाही, ही अत्यंत गंभीर आणि खेदाची बाब आहे.

**गंगाधर मुटे**
आर्वी छोटी - ४४२३०७,
तह. हिंगणघाट, जि. वर्धा.
gangadharmute@gmail.com
www.baliraja.com, मो. ९७३०५८२००४

■■

# कर कर्जा नहीं देंगे, बिजली का बिल भी नहीं देंगे


रिझर्व्ह बँकेने भाववाढीवर नियंत्रण ठेवण्यासाठी वारंवार व्याजदर वाढवण्याची उपाययोजना केली आहे. या उपाययोजनेमुळे कर्जवितरणावर परिणाम होऊन बाजारातील चलनाचा पुरवठा कमी झाला आहे. त्याचाच परिणाम म्हणून औद्योगिक उत्पादनात घट झाली आहे. जागतिक मंदीमुळे निर्यातीलाही मर्यादा पडल्या आहेत. साखर, कापूस, कांदा वगैरे शेती उत्पादनांवरती सरकारने निर्यातबंदी लावल्यामुळे आणि जागतिक बाजारपेठेत कापसाची आणि साखरेची मुबलकता असल्यामुळे तसेच आपण उशिरा जागतिक बाजारपेठेत उतरल्याने त्यांनाही जागतिक बाजारपेठेत उठाव नाही. अशा औद्योगिक आणि कृषिमालाच्या निर्यातीच्या मंदीच्या काळातच सोनिया गांधींना हे सर्व गरिबांना घास भरवण्याचे स्वप्न पडले आहे.



**ज्ञानेश्वर शेलार**

शेतकरी संघटनेने शेतकऱ्यांना पुरेशी व पूर्ण दाबाने वीज मिळत नाही त्यासाठी कुठलेही बिल शेतकऱ्यांनी भरू नये, असे आंदोलन गेल्या दहा वर्षांपूर्वीच घोषीत केलेले आहे. हे आंदोलन सुरू असल्याचा एक सरकारी पुरावाच समोर आला आहे. महावितरणच्या वाणिज्य शाखेच्या मुख्य अभियंत्यांनी महाराष्ट्रातील १४ परिमंडळांतील मुख्य अभियंत्यांना वसुली बाबतच्या ताज्या माहिती संदर्भात पाठविलेल्या पत्रामुळे ही माहिती उघड झाली आहे. राज्यात प्रशासनाच्या दृष्टीने सोयीचे ठरावे म्हणून महावितरणचे भांडूप, कल्याण, कोकण, बारामती, जळगाव, कोल्हापूर, लातूर, नांदेड, नाशिक, पुणे, अमरावती, औरंगाबाद, नागपूर शहर व नागपूर असे १४ परिमंडळांत विभाजन करण्यात आले आहे. या परिमंडळांच्या मुख्य अभियंत्यांनी शेतकऱ्यांकडे असलेल्या थकबाकी संदर्भात पाठविलेल्या माहितीनुसार वीज कनेक्शन घेतल्यापासून एकदाही बिल न भरलेल्या राज्यांतील ६ लाख ४५ हजार ८५८ कृषीपंप धारक शेतकऱ्यांकडे १ हजार ७८८ कोटी ३३ लाख रुपये थकबाकी असल्याची माहिती समोर आली आहे. (संदर्भ. दै. महाराष्ट्र टाइम्स, २१ डिसेंबर २०११) आपल्याला मिळणारी सेवा सदोष आहे. शेतकऱ्यांना दिली जाणारी वीज ही प्रथम घरगुती वापर नंतर औद्योगिक त्यातही अगोदर मोठ्या शहरांमध्ये त्यानंतर तालुक्याच्या गावांमध्ये आणि शिल्लक राहिली तर शेतकऱ्यांना अशी खरकटी वीज दिली जाते. त्याचे पैसे देणे किती न्याय्य आहे, यासाठीच या बहाद्दर शेतकऱ्यांनी आम्हाला २४ तास पूर्ण दाबाने वीज मिळत नसेल, तर आम्हीही वीज बिल देणे लागत नाही हे सिद्ध करून दाखवले आहे. राज्यात एकूण ३२ लाख ८८ हजार ५० कृषीपंप धारक आहेत. त्यांच्याकडे एकूण १ हजार ७८८ कोटी ३३ लाख रुपये थकबाकी आहे. यातील ४२५ कोटी ६ लाख रुपये अमरावती परिमंडळ, ३१५ कोटी २२ लाख रुपये - लातूर परिमंडळ, ३०३ कोटी ५२ कोटी - औरंगाबाद परिमंडळ अशी थकबाकी आहे. अमरावती परिमंडळाचा थकबाकीत प्रथम क्रमांक आहे. नांदेडमध्ये ८० हजार २०५ शेतकऱ्यांकडे २६७ कोटी ६० लाख ७७ हजार रुपये थकबाकी आहे. प्रगतीशील शेतकऱ्यांचा प्रदेश म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नाशिकच्या शेतकऱ्यांकडे १७७ कोटी ७० लाख ६२ हजार रुपये थकबाकी आहे. केंद्रीय कृषीमंत्री शरद पवार तसेच माजी ऊर्जा मंत्री व सध्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या बारामतीतील शेतकऱ्यांकडे ३१४ कोटी, जळगावच्या शेतकऱ्यांकडे १११ कोटी, कोल्हापूरच्या शेतकऱ्यांकडे ६ कोटी आणि पुणे विभागातील शेतकऱ्यांकडे ४ कोटी ८२ लाख रुपयांची थकबाकी आहे.

वरील थकबाकी पाहता ऊसपट्ट्यामध्ये तसेच द्राक्षपट्ट्यामध्ये थकबाकीचे प्रमाण थोडे कमी असल्याचे दिसते. अमरावती, नागपूर या कापूस पट्ट्यांतील तसेच माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या कोरडवाहू लातूर विभागातील थकबाकी सर्वांत अधिक आहे. या भागात बागायती शेतीचे प्रमाण कमी असून कोरडवाहू पावसावर अवलंबून असणाऱ्या शेतीचे प्रमाण अधिक आहे. या विभागातील शेतकरी पाण्याचा बारमाही वापर



करत नाहीत, तरीही त्यांच्याकडे थकबाकी अधिक आहे याचाच अर्थ या भागातील शेतकरी हतबल झालेला असून थकबाकी भरण्याच्या आर्थिक परिस्थितीत नसल्याचे दिसून येते.

महाराष्ट्रामध्ये व एकूणच देशात वीजउत्पादनाची परिस्थिति फारशी समाधानकारक नाही हे वारंवार समोर आले आहे. १५ वर्षांपूर्वी मोठा गाजावाजा करीत अमेरिकेतील काळ्या यादीत टाकलेल्या कंपनीला दाभोळजवळ 'एन्रॉन' हा गॅसवर आधारित वीजनिर्मिती प्रकल्प आणण्यात आला. पर्यावरणवाद्यांचा तीव्र विरोध गॅसच्या उपलब्धतेबाबतची अनिश्चितता आणि मुळातच काळ्या यादीत टाकलेली कंपनी यामुळे हा प्रकल्प सुरू झाला नाही. कोट्यवधी रुपयांची भांडवली गुंतवूणक आजही गंजत पडलेली आहे. एन्रॉनला विरोध करताना गोपीनाथ मुंडेंनी सत्तेत येण्यासाठी व केवळ विरोधाला विरोध म्हणून एन्रॉनला समुद्रात बुडवू अशा घोषणा केल्या. महाराष्ट्रात अंदाजे ५ हजार मेगावॅटचा तुटवडा सध्या कायम आहे. मुंडेंच्या नावेला सध्या अनेक छिद्रे पडली असून तीच बुडण्याच्या बेतात आहे. राष्ट्रवादीची नाव मात्र पोटनिवडणुकीच्या वेळी वेगाने धावली व येत्या जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकांमध्येही या नावेत बसलो तरच आपण निवडणुकीची नदी पार करू असे वाटल्याने अनेकजण या नावेत बसण्यासाठी गर्दी करत आहेत. अशावेळी या दोन्हीही निवडणुका ग्रामीण भागाशी निगडीत असल्याने शेतकऱ्यांना लोडशेडींगचा तर विसर पडणार नाही ना, अशी शंका येते.

जैतापूर येथील अणुवीज प्रकल्पाला पर्यावरणवाद्यांचा झालेला विरोध व शेतकऱ्यांची कवडीमोल भावाने जमीन अधिग्रहण करण्याचा सरकारचा प्रयत्न यामुळे तोही प्रकल्प भिजत पडला आहे. या प्रकल्पाला जपानमध्ये झालेल्या त्सुनामीमुळे अणुऊर्जा प्रकल्प हे धोकादायक असल्याचे लोकांना वाटते त्यामुळेही विरोध होत आहे. खरे तर, केवळ जमिनीचा मोबदला योग्य मिळावा हाच त्यातील विरोधाच खरा मुद्दा आहे; परंतु त्या ऐवजी तो मुद्दा बाजूला पडून पर्यावरणवादीच अधिक उचल खात आहेत. सध्या गुजरात आणि मध्यप्रदेश येथे वीजेचा तुटवडा नाही. २००३ सालापर्यंत या दोन्हीही राज्यांत महाराष्ट्रापेक्षाही वीजेची परिस्थिति खालावलेली होती. त्याचे कारण मेधा पाटकरांनी नर्मदा सरोवर प्रकल्पाला १० वर्षे विरोध केला. गुजरात मध्यप्रदेश आणि राजस्थान या भागांत पाणी व विजेचे प्रश्न लोंबकळत राहिले. नर्मदा सरोवराचे काम पूर्ण झाल्यानंतर मात्र गुजरातमध्ये झपाट्याने विकास झाला. त्याचवेळेस नेमके नरेंद्र मोदी सत्तेत आले. त्याचे श्रेय त्यांना दिले जात असले तरी हे श्रेयाचे खरे कारण मेधा पाटकरांचे आंदोलन संपले त्यामुळे विजेचा तुटवडा भरून निघाला हे आहे. नरेंद्र मोदींनी त्याचे श्रेय घेणे हे आयत्या पीठावर रेघोट्या ओढण्यासारखे आहे.

सध्या राज्यभर पवनऊर्जा प्रकल्पांना वेगवेगळ्या कारणांनी विरोध होत आहे. काही शेतकरी संघटनाही त्यात आघाडीवर आहेत. पवनऊर्जेची खरे तर खूप आवश्यकता आहे. राज्यामध्ये बऱ्याच ठिकाणी पवनऊर्जा निर्माण करणे शक्य आहे. त्यालाही पर्यावरणवादी विरोध करत आहेत. तसेच पवनचक्क्या या अनधिकृत आहेत, असे कारण सांगून काही शेतकरी संघटना विरोधात उतरल्या आहेत. या प्रकल्पांमध्येही शेतकऱ्यांच्या जमिनी जिथे गेलेल्या असतील त्यांना योग्य मोबदला मिळणे एवढाच खरा प्रश्न आहे. राज्यात काही साखर कारखाने वीजनिर्मिती करीत आहेत, काही साखर कारखाने स्वतंत्रपणे सौरऊर्जा प्रकल्प उभारित आहेत. त्यातही सध्याची वीजनिर्मिती पारेषण आणि वितरण यासाठीचे जे नियम आहेत ते अतिशय जाचक असल्याने त्यांनाही अडचणी येत आहेत. काही शहरांभोवती कचऱ्यापासून वीजनिर्मितीचे प्रयत्न चालू आहेत. धुळे जिल्ह्यातील साकरी येथे देशातील सर्वांत मोठा सौर प्रकल्प उभारण्यात येत आहे. या सगळ्या प्रकल्पांना गती का मिळत नाही? हा प्रश्न वारंवार समोर येतो. त्याचे कारण एकच आहे, सध्या तरी महावितरण ही एकमेव सरकारी कंपनी या सर्व कारभारात हस्तक्षेप करून आहे. सहकारी साखर कारखान्यांनी, खासगी उद्योगांनी किंवा अन्य कोणीही पवन, सौर किंवा कचऱ्यापासून वीजनिर्मिती केल्यास तिचा भाव ठरवणे महावितरणच्या पर्यायाने सरकारच्या हातात आहे. त्यांना वीज विकायची असेल तर सरकारलाच विकावी लागते. हा एकहाती कारभार आणि तोही सरकारच्या हातात ही यातली मुख्य अडचण आहे.

सध्यातरी खासगी उद्योगांना वेगवेगळ्या तऱ्हेने वीजनिर्मिती करण्यास परवानगी देणे हेच ऊर्जाक्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणावर भांडवल गुंतवणूक होणे व नवीन तंत्रज्ञान येणे यासाठी आवश्यक आहे. वाहतूक शिक्षण दळणवळण या सर्वांसाठी खासगी क्षेत्राला हळूहळू दारे खुली होत असताना ऊर्जा क्षेत्र हे अत्यंत कळीचे क्षेत्र मात्र सरकारने आपल्याच ताब्यात ठेवले आहे. खुलीकरण येऊ नये ही सरकारची मनिषा यातून स्पष्ट दिसते.

माजी राष्ट्रपती अब्दूल कलाम यांनी अवकाशात वीज तयार करून लेसर किरणांच्या किंवा अन्य तंत्रज्ञानाने पृथ्वीवर आणून विजेची मुबलकता करण्याची अभिनव कल्पना मांडली आहे. आपण अजून कचऱ्यापासूनच वीजनिर्मिती करू शकत नाहीत, तर अवकाशातील वीज आणणे ही फार दूरची गोष्ट आहे. हीच संकल्पना कदाचित अमेरिका किंवा अन्य कुठलेतरी युरोपीयन राष्ट्र खरोखर सत्यात उतरवील आणि काही वर्षांनी आपल्यालाच त्यांच्याकडे तंत्रज्ञानासाठी याचना करावी लागेल. टीव्ही बघितल्यानंतर महभारतात आमच्या संजयला तर अशी दृष्टी होतीच. श्रीकृष्ण जन्माच्या वेळी आकाशवाणी झाली. तुम्ही रेडीओच्या शोधाबद्दल काय सांगता? या सर्वच गोष्टी आमच्याकडे पूर्वीच होत्या, अशी फुशारकी आणखीन पाच-पंचवीस वर्षांनी आपण मारू! पण या सर्व संकल्पना प्रत्यक्षात व्यवहारात आणण्याची आपली कुवत आहे का? की आपण महाभारत-रामायणाची पारायणे करणे आणि इतिहासाचे गोडवे गाणे एवढेच करत बसणार आहोत हाच खरा प्रश्न आहे.


शेतकऱ्यांनी वीज मिळत नसताना, अठरा-अठरा तास लोडशेडींग असताना, दहा-दहा वर्षे वीजजोडणीसाठी पैसे भरलेले असताना खताचे भाव गगनाला भिडलेले असताना आणि त्याचा नेमका हंगामात तुटवडा असताना शेतीसाठीच्या पतपुरवठ्याची वाताहत झालेली असताना कुठलेही तंत्रज्ञान शेतीत येण्यास अटकाव केला जात असताना निर्यातबंदी, आयातबंदीने जागतिक बाजारपेठेची दारे बंद केलेली असताना देशात भरघोस धान्योत्पादन केलेले आहे. त्यांच्या कष्टाला आणि मेहनतीला पारावार नाही. असे असतानाही पुन्हा त्यांच्यावर एकशे एकवीस कोटी लोकांना खाऊ घालण्याची जबाबदारी आणि त्यातच अन्नसुरक्षेसारखे बिल आणण्याचा सरकारचा इरादा अशा अडथळ्यांतून शेतकरी कसाबसा तगून आहे. वीज बिल भरणे शक्य नाही, बँकेचे कर्ज भरणे शक्य नाही, अशा परिस्थितीत एकतर बँकांच्या आणि महावितरणच्या विरुद्ध दंड थोपटणे जसा वरील शेतकऱ्यांनी थोपटला आहे. निगरगट्ट होऊन अस्मानी आणि सुलतानीला तोंड देत राहणे आणि हे सगळे जमले नाहीच तर गळफास जवळ करणे किंवा विष तोंडाला लावणे एवढाच मार्ग शिल्लक आहे. थकबाकीचे आकडे पाहिल्यानंतर मात्र शेतकऱ्यांनी ठरवून टाकलेले दिसते- आम्ही आता विष पिणार नाही, गळफास घेणार नाही आणि थकबाकीही भरणार नाही. कर, कर्जा नहीं देंगे- बिजली का बिल भी नहीं देंगे.

**ज्ञानेश्वर शेलार**
मो. ९२२६७९७०१८

■■

# शेतमाल बाजार : संप, कंप व दंभ

**वस्त्रोद्योग अडचणीत येऊ नये म्हणून कापसाचे देशांतर्गत भाव अशा कृत्रिमरीतीने किमान पातळीवर ठेवणे ही तर चेष्टेच्या क्रूरतेची सीमा झाली. इतर राज्यांमध्ये अशी आंदोलने झाली नाहीत म्हणून महाराष्ट्रातल्या शेतकऱ्यांना काही मदत करता येत नाही हाही दावा क्रूरच समजला पाहिजे. आपल्या अन्यायाप्रती सजग असलेला व त्याची नेमकी फोड करून मागण्या करणारा महाराष्ट्रातील शेतकरी नतद्रष्ट असावा असाही सरकारचा समज असल्याचे स्पष्ट होते.**



गिरधर पाटील

राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समित्यांतील परवानाधारक व्यापाऱ्यांनी सोमवार पासून संपावर जाण्याची हाळी दिली आहे. व्यापाऱ्यांकडे देय असलेल्या माथाडी कामगारांच्या सात कोटींच्या थकबाकी वसूलीबाबत महसूलखात्याने कारवाई सुरू केल्याने या कारवाईच्या विरोधात हा संप असल्याचे सांगितले जाते. अनेक संपाना कारणीभूत ठरलेला, गेली कित्येक वर्षे भिजत पडलेलला प्रश्न अजूनही का सोडवला जात नाही, याचबरोबर या प्रश्नाचे हत्यार म्हणून वापरतांना शेतमाल तयार होऊन बाजारात यायची वेळ झाली की व्यापारी, माथाडी, सरकार व लोकप्रतिनिधि यांना नेमकी याच वेळी कशी जाग येते या साऱ्यांचा संबंध शेतमालाच्या शोषणाशी जोडला तर तो गैर वाटू नये इतक्या उघडपणे ही कटकारस्थाने चालू असल्याचे दिसते.

अगदी मूलभूत विचार केला तर यात भरडल्या जाणाऱ्या शेतकऱ्यांचा या विषयाशी तसा अर्थाअर्थी काही संबंध नाही. बाजार समितीत विक्रिस येणाऱ्या शेतमालाच्या विक्रिप्रक्रियेतील व्यापारी व त्यांना सेवा देणारे माथाडी यांच्यातील काही कायदेशीर तरतुदींविरोधात झालेला हा वांधा आहे. यासाठी बाजार समिती कायद्यात वांधा समितीचे प्रयोजनही आहे. परवडत नसेल तर त्यांनी हेच काम करावे अशी कायद्याने त्यांच्यावर सक्तीही नाही. त्यांच्यातील भांडणाचा संसर्ग शेतकऱ्यांना पोचावा असे यात काही नाही. आजही माथाडी व व्यापारी या साऱ्या बाजार समित्यांतून सुखनैवपणे आपापली कामे करीत आहेत. मग असे काय घडावे की साऱ्या बाजार समित्या बंद पाडाव्यात अशी परिस्थिती निर्माण झाली?

व्यापारी व माथाडी यांच्यातला हा वाद संपूर्णपणे बाजार समित्यांच्या अखत्यारीतला आहे. वांधा समितीत निर्णय न झाल्यास संबंधितांवर अगदी परवाने रद्द करण्यापर्यंतच्या कायदेशीर तरतूदीही उपलब्ध आहेत. ते न करता एकदा न्यायालयात गेले की वेळकाढूपणा अवलंबत आपला खाण्याचा कार्यक्रम अव्याहतपणे चालू ठेवता येतो. मागे याच विषयावर पुण्याच्या बाजार समित्यांतील व्यापाऱ्यांनी असा सुगीचा मुहूर्त साधत संपाची हाळी दिली होती. शुक्रवारी झालेल्या व्यापाऱ्यांच्या या बैठकीच्या बातम्या शनिवारच्या वृत्तपत्रांतून झळकल्या. त्याच दिवशी शेतकरी संघटनेने तातडीची बैठक घेऊन सदरचा संप हा बेकायदेशीर असून संपावर जाणाऱ्या व्यापाऱ्यांचे परवाने प्रशासकाने रद्द करावेत अशी पणन मंत्र्यांना जाहीर सूचना केली. न केल्यास आंदोलनाचा इशाराही दिला. त्याच्या बातम्या रविवारी आल्या. आता काहीतरी करावे लागेल या भितीने चक्रे फिरली व सोमवारी सकाळीच व्यापाऱ्यांना हा संप मागे घ्यावा लागला. या गोंधळाला जबाबदार असणाऱ्या घटकांना ताळ्यावर आणण्याचे एवढे प्रभावी हत्यार हातात असतांना बाजार समित्यांचे व्यवस्थापन ते प्रभावीपणे का वापरत नाही हा एक मोठा प्रश्न आहे.

महसूल खात्यालाही आताच जाग आली असे समजले तर याच खात्याकडे यापेक्षाही अगोदरची सहकारखात्यातील, त्या अनुषंगाने बाजार समित्यांतील कारवाईची प्रकरणे उचित कारवाईसाठी प्रलंबित आहेत. त्यांचा पाठपुरावा करतांना हेच खाते ताकास तूर लागू देत नाही. मग झटका आल्यासारखे अचानकपणे हे खाते कसे जागे होते ? नाशिक कृषि उत्पन्न बाजार समितीतील सुमारे वीस कोटींच्या भ्रष्टाचाराच्या वसूलीचे काम सर्वोच्च न्यायालयाचे आदेश असूनही जिल्हाधिकाऱ्यांकडे प्रलंबित आहे. त्यावर काही न करता ऐन निवडणुकांच्या घबडगाईत हा अडगळीत पडलेला मुद्दा अचानकपणे बाहेर का यावा ? म्हणजे सरकारही या कटकारस्थानास सामील असल्याचे दिसते.

लोकप्रतिनिधिंचे तर विचारायलाच नको. जे सत्तेत आहेत, सत्तेची अनेक पदे उपभोगताहेत, ज्यांना या प्रश्नाची जाण नसली तरी हा प्रश्न गंभीर असल्याची माहिती आहे, त्यांना या विषयाची जाहीर वाच्यता करून शेतकऱ्यांच्या बाजूने आंदोलन करण्याची हाळी देण्याची पाळी यावी यातच त्यांच्या लोकप्रतिनिधित्वाची गुणवत्ता लक्षात यावी. वास्तविक माध्यमांकडे जाण्यापेक्षा आपल्याच पक्षातील धोरणात्मक निर्णय घेण्याची जबाबदारी असणाऱ्या पदाधिकाऱ्यांकडे तड लावली तर मार्ग काढता येऊ शकतो. मात्र शेतकरी प्रेमाचे नाटक बजावतांना आपले भरलेले तोंड व पोट हे लपवता येत नसल्याने या साऱ्यांची दमछाक होते आहे. आताच्या या वातावरणात अजून शेतकऱ्यांकडून फारशा प्रतिक्रिया आलेल्या नाहीत. आंदोलन तर दूरची गोष्ट. आपल्या आंदोलनांवर स्वार होऊन आपल्या राजकारणाची पोळी भाजून घेणारे सत्ताधारी व लाठ्याकाठ्यागोळ्या खाऊन देखील मूळ प्रश्न न सुटता त्याहीपेक्षा गंभीर परिस्थितीला तोंड द्यावे लागत असल्याने शेतकऱ्यांनाही नेमकी काय भूमिका घ्यावी हा प्रश्न पडला आहे.

शेतीच्या प्रश्नांची जाण असलेल्याची शेखी मिरवणाऱ्या पक्षाच्या हातात या साऱ्या बाजार समित्या आहेत. सरकारी खाती वा स्थानिक स्वराज्य संस्थांना लाजवेल एवढी आर्थिक उलाढाल या शेतमाल बाजारातून होते. ही उलाढाल शेतकऱ्यांच्या जीवावर उठली आहे. नुसते वाशीचे उदाहरण घेतले तर रोज सुमारे तीस कोटींची उलाढाल या एका बाजारपेठेत होते. यावरून महाराष्ट्रातील आकड्याचा अंदाज यावा. करोडोंची उलाढाल असलेल्या शेअरबाजारात दहा लाख अनामतीवर व्यवसाय करता येतो, मात्र तुम्हाला जर वाशीच्या बाजारात व्यवसाय करायचा असेल तर आजचा दर आहे एक कोटी रूपये. साधा माथाडींचा हमाली करण्याचा बिल्ला हवा असेल तर त्याचा दर आहे वार्षिक पाच लाख रूपये. हे प्रातिनिधिक आकडे या बाजारपेठांतून होणाऱ्या आर्थिक उलाढालींचे निदर्शक आहेत व तेथील वाद थेट मारामाऱ्या व खूनापर्यंत का पोहचतात हेही या निमित्ताने लक्षात येईल.


यात महत्वाची वा कळीची भूमिका असणाऱ्या पणन खात्याची तर गोष्टच वेगळी. व्यापारी व माथाडी या दोघांना न्याय मिळवून देण्याचे गाजर दाखवत दोन्हीकडचा लोण्याचा गोळा गट्टम करीत हा प्रश्न गंभीर करत आणला आहे. एकदा हाताबाहेर गेले वा आता दोघांकडून फारसे काही मिळण्याची शक्यता नाही असे झाले की मुद्दा न्यायप्रविष्ट करून टांगणीला लावायचा. या साऱ्या घटनाक्रमाचा बारकाईने विचार केल्यास व्यापारी, बाजार समित्यांचे व्यवस्थापन, माथाडी व लोकप्रतिनिधि या साऱ्यांची मिलीभगत असून सदरचा व्यापाऱ्यांचा संप हा शेतकऱ्यांना कंप आणणारा व राजकारण्यांचा दंभ प्रकट करणारा आहे असेच म्हणावे लागेल.

**डॉ. गिरधर पाटील**
http://girdhar-liberals.blogspot.com
girdhar.patil@gmail.com

■■

# खरे लोकप्रतिनिधी मिळणार केव्हा?

निवडणूक सुधारणांची चर्चा सुरू आहे. साध्या मलमपट्टीने बदल होणार नाहीत. भारतीय निवडणूक पद्धतीत अमुलाग्र बदलाची गरज आहे. 'खरे' लोकप्रतिनिधी निवडून येण्यासाठी, इंग्लंडच्या 'हाऊस ऑफ लॉर्ड्स'च्या पद्धतीची मतदारसंघांची रचना बदलून, प्राधान्यक्रमानुसार मतदानपद्धती आणणे व मतदान प्रक्रियेचा कालवधी वाढविणे निकडीचे आहे, वरवरची मलमपट्टी करून आपल्या लोकशाहीचे दुखणे बरे होणार नाही.



**अमर हबीब**

लोकसभेची पहिली निवडणूक १९५२ साली झाली. यासाठ वर्षांत सातत्याने निवडणूक सुधारणांची चर्चा होत आली आहे. किरकोळ अपवाद सोडले तर फारश्या सुधारणा झाल्या नाहीत. आपण स्वीकारलेल्या पद्धतीतून 'खरे' लोकप्रतिनिधी निवडले जातात का? या प्रश्नाला मात्र सगळ्यांनी बगल दिली आहे.

मुख्य निवडणूक आयुक्त एस.वाय.कुरेशी यांनी गेल्यावर्षी 'निवडणूक सुधारणा' या विषयावर देशातील प्रमुख महानगरांतून चर्चासत्रे घेऊन काही प्रस्ताव केंद्र सरकारला पाठविले. प्रमुख्याने गुन्हेगारांना निवडणूकीपासून दूर कसे ठेवता येईल याविषयीच्या या सूचना आहेत. 'लोकपालवरील चर्चेत वेळ गेल्यामुळे निवडणूक सुधारणांविषयीच्या प्रस्तावांवर चर्चा होऊ शकली नाही,' अशी खंतही त्यांनी व्यक्त केली. मध्यंतरी अण्णा हजारे यांनी, आपला अगामी मुद्दा, निवडणूक सुधारणा राहील अशी घोषणा केली होती. १९७५ साली जयप्रकाश नारायण यांच्या नेतृत्वाखालील 'संपूर्ण क्रांती' आंदोलनातून 'राईट टू रिकॉल'ची मागणी पुढे आली. तिचा आण्णा हजारेंनी पुनरुच्चार केला व 'राईट टू रिजेक्ट'च्या मागणीवर भर दिला. मुख्य निवडणूक आयुक्त कुरेशी यांनी 'राईट टू रिकॉल'ची मागणी फेटाळताना 'देशाच्या सुरक्षेला घातक असल्यामुळे स्वीकारता येणार नाही' असे म्हटले. भा.ज.प.चे जेष्ट नेते लालकृष्ण आडवाणी हे देखील 'राईट टू रिकॉल'ला अनुकूल नाहीत. त्यांनी कुरेशींच्या सुरात सूर मिसळला.

आमच्या देशातील निवडणूक पद्धतीतील कळीचा मुद्दा 'खऱ्या' लोकप्रतिनिधित्वाचा आहे. मतविभाजनामुळे अल्पमत घेणारा उमेदवार निवडला जातो, हा या पद्धतीतील मोठा दोष आहे. विद्यमान पद्धतीत जो सर्वांत जास्त मते घेईल त्याला विजयी घोषित केले जाते. एका निवडणूकीत पाच उमेदवार उभे राहिले. चौघांनी १९-१९ मते घेतली व एकाला २० मते पडली. चार मते बाद झाली. अशा स्थितीत ७४ टक्के लोकांनी ज्या उमेदवाराला मते दिली नाहीत व केवळ २० टक्के मते घेऊन तो निवडून आला, अशी विचित्र स्थिती आज आहे. अल्पमतातील लोकांच्या हातात सत्ता देणे हे लोकशाहीला अपेक्षित नाही. गेल्या साठ वर्षांत सत्ताधारी पक्षाने ५० टक्केपेक्षा जास्त मते घेतली, असे एकही उदाहरण आढळत नाही. याचा अर्थ असा की, आपल्या देशातील कारभार बहुमताने चालत नसून तो सर्वाधिक मताने चालतो. सर्वाधिक मतशाही म्हणजे लोकशाही नव्हे. लोकशाही म्हणजे बहुमतशाही.

यावर उपाय नाही का? निश्चितच आहे. मतदानाची प्राधान्यक्रम (प्रेफेन्सीयल) पद्धत तुलनेने चांगली आहे. त्यात उमेदवारांना प्राधान्यक्रम देता येतो. प्रचलित सदोष पद्धत आपल्या देशात स्वीकरली गेली तेव्हाही अनेक देशांत यावर उपाय काढलेला होता व प्राधान्यक्रम (प्रेफेन्सीयल) पद्धत वापरली जात होती. आपल्या देशात या पद्धतीकडे कानाडोळा केला गेला. देश मोठा आहे, निरक्षरांची संख्या जास्त आहे. ही ठरलेली कारणे सांगण्यात आली. ही दोन्ही कारणे तकलादू आहेत. देशाचे स्वातंत्र्य लांबणीवर टाकण्यासाठी देखील हीच कारणे सांगितली जात होती, तेव्हा म.गांधी म्हणाले होते, 'तुम्ही आमच्या पाठीवरून उतरा. पुढे कसे चालायचे ते आमचे आम्ही पाहू.' प्राधान्यक्रम पद्धती नाकारणाऱ्यांना आजच्या पद्धतीतील दोष दिसत नाहीत का?

नोकरदारांची सोय बघूनच आपल्याकडे सर्व पद्धती ठरतात. निवडणूक पद्धतही त्याला अपवाद नाही. वर्तमान पद्धतीत मतदारांची सोय बघण्यात आली नाही. उदाहरणार्थ एकाच दिवसात मतदान उरकले पाहिजे, असा कार्यक्रम बनविणे. म्हणायला आम्ही मतदार राजे. मतदानाला या आणि रांगेत उभे रहा! या राजांचे नोकर कर्मचारी मात्र आरामात खुर्चीत बसून राहणार. मतदानाच्या दिवशी सार्वत्रिक सुट्टी असेल तर सरकारी कर्मचाऱ्यांचा पगार चालू. बिगर सरकारी लोकांनी मात्र खाडा करून रांगेत उभे राहायचे. त्यांचा रोजगार बुडणार. कामाचा खोळंबा होणार. मतदान आठवडाभर ठेवले तर काय बिघडले असते? कर्मचाऱ्यांना बसावे लागले असते. त्याचा त्यांना पगार मिळतो. मतदार आपल्या सोयीने आठवड्याभरात केव्हाही येऊन मतदान करून गेले असते. मतदाराला ताण पडला नसता. मतदानाचे प्रमाण वाढले असते. 'मतदान आठवडा' केला तर कमी मतदान केंद्रांवर काम भागू शकते. कमी कर्मचारी म्हणजे कमी खर्चात निवडणुका पार पाडता आल्या असत्या. मतदानाचा आठवडा केला तर प्राधान्यक्रम मतदान पद्धत कार्यान्वित करायला अजिबात अडचण येणार नाही.

मतदार संघांच्या बाबतीत केलेल्या गफलतीची मोठी किंमत देश मोजीत आहे, ही बाब कोणत्याही लोकसभेच्या कामकाजाचा तपशील वाचला की आपल्या सहज लक्षात येते. इंग्लंडच्या 'हाऊस ऑफ लॉर्ड्स'च्या पद्धतीची मतदारसंघांची रचना आपण स्वीकारली. खरे तर, देश स्वतंत्र होताच आपण सगळे संस्थानिक खालसा केले. 'लॉर्ड्स'चा विषय संपला होता. दुर्दैवाने देशाची धोरणे ठरविणाऱ्यांवर इंग्रजांचा एवढा पगडा होता की, त्यांची पद्धतच त्यांनी आदर्श मानली व मतदार संघ तयार केले. आपला मतदार संघ हेच आपले क्षेत्र. देशात अन्यत्र काय व्हायचे तो होवो, माझा मतदारसंघ माझ्यासाठी शाबित राहिला पाहिजे. ही भूमिका जन्माला आली. मतदार संघातून निवडून येणाऱ्याला देशात 'पोटा' कायदा असावा की नसावा? रिटेलच्या क्षेत्रात थेट विदेशी गुंतवणूक असावी की नसावी? नागालँडचा प्रश्न सोडविण्यासाठी कोणता कायदा करायला हवा? अशा प्रश्नांशी काही देणे घेणे राहिले नाही. मतदार संघाच्या वर्तमान पद्धतीमुळे राष्ट्रीय वा राज्यस्तरीय प्रश्नांचे आकलन ठेवण्याची गरज उरली नाही. या प्रश्नांवर पक्षाचा आदेश प्रमाण मानावा, आपले मत देऊ नये असा साडसूद संकेत तयार झाला.

संसद किंवा विधान सभेत कायदे तयार केले जातात. तेथे जाणाऱ्या प्रतिनिधींचे आकलन राष्टीय व राज्यस्तरीय असले पाहिजे. वर्तमान मतदार संघाच्या रचनेमुळे असे प्रतिनिधी निवडून येणे वा विकसित होणे दुरापास्त आहे. देशाचा वा राज्याचा एक मतदारसंघ करून त्यातून तेवढे प्रतिनिधी निवडण्याची पद्धत आपण स्वीकारू शकतो का? याचाही विचार केला पाहिजे. देशाची सर्वोच्च सत्ता व्यापक आकलनाच्या दृष्टीने थिटी पडणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे.

'खरे' लोकप्रतिनिधी निवडून येण्यासाठी, इंग्लंडच्या 'हाऊस ऑफ लॉर्ड्स'च्या पद्धतीची मतदारसंघांची रचना बदलून, प्राधान्यक्रमानुसार मतदानपद्धती आणणे व मतदान प्रक्रियेचा कालवधी वाढविणे निकडीचे आहे, वरवरची मलमपट्टी करून आपल्या लोकशाहीचे दुखणे बरे होणार नाही हे यांना कधी कळेल?

■■

# नव्या जगाला सामोरे जाणाऱ्या युवकांनो...

**१२ जानेवारी हा युवक दिन म्हणून साजरा केला जातो. या निमित्ताने आजच्या तरुणांशी केलेला हा संवाद.**

युवक-युवतींनो,

संपूर्ण जग बदलत असताना तुम्ही तरुण आहात. या अर्थाने तुम्ही भाग्यवान आहात. आमच्या आधीच्या पीढीच्या काळात फक्त रेडियो आला होता. आमच्या काळात टी.व्ही. आणि इंटरनेट आले. तुमच्या काळात काय काय येईल, काहीच सांगता येत नाही. नवे तंत्रज्ञान दिवसागणिक नवी वस्तु साकारत आहे. ती वस्तु तुमच्या हातात येत आहे. बदल सर्वव्यापी होत आहेत. हे बदल अकल्पितही आहेत. जे स्वप्नातही कधी दिसले नाही ते तुमच्या समोर प्रकट होत आहे. 'पुढच्यास ठेच मागचा शहाणा' अशी एक म्हण एकेकाळी होती. त्या काळात बाप ज्या वाटेने जायचा, त्याच मार्गाने मुलालाही जावे लागायचे. बापाचे जीवन ज्या चाकोरीत व्यतीत व्हायचे, त्याच पद्धतीने मुलांचेही व्हायचे, बापाला आलेले अनुभव मुलाच्या कामी यायचे. आता परिस्थिती वेगळी आहे. वडीलांचा मार्ग वेगळा. मुलांचा वेगळा. त्यामुळे मागच्या पिढीतील अनुभवांचे शहाणपण आजच्या पिढीतील मुलांना फारसे उपयोगी पडत नाही. तथाकथित महात्म्यांची वचने वा पुरातन पुस्तकेदेखील तुम्हाला मार्गदर्शन करू शकणार नाहीत. तुम्हालाच अनुभवातून शिकावे लागेल. आपणच शोधक आणि आपणच वाटसरू अशा पद्धतीने मार्गाक्रमण करावे लागणार आहे. हे काम कठीण आहे, पण त्याला पर्याय नाही.

मित्र-मैत्रिणींनो, बदलत्या काळाला सामोरे जाताना, काही धोके संभावतात. काही धोके तुमचा पिच्छा करीत आहेत.तर काही धोक्यांकडे तुमची पावले ओढली जातात. त्यांना तुम्ही नीट ओळखा. त्यांच्यापासून सावध राहा.

लहानपणापासून आपल्याला जाती-धर्माचा अभिमान शिकविला जातो. घरा-घरांतून होणारा हा संस्कार तुम्हाला अडकविणारा पहिला सापळा आहे. आपण कोणत्या जातीत वा धर्मात जन्माला यावे हे आपल्या हातात नसते. तो केवळ अपघात असतो. जी गोष्ट अपघाताने मिळाली, योगायोगाने मिळाली, त्याचा अहंगंड वा न्यूनगंड बाळगण्याचे काहीच कारण नाही. आपण माणूस आहोत. आपण कोणापेक्षा श्रेष्ठही नाहीत वा कनिष्ठही नाहीत. असे असलेतरी जातीच्या-धर्माच्या संघटना नेमके तुमच्यावर लक्ष ठेवून असतात. बगळा जसा माश्यांसाठी टपून बसलेला असतो, अगदी तसेच ते तुमच्यावर जाळे टाकून तुमच्या अडकण्याची वाट पाहत असतात. मोठे तत्वज्ञान सांगतात. जाती-धर्मासाठी बलीदान देण्यासाठी भुरळ पाडतात. जाती व धर्म समाजासाठी कार्य करण्याची प्रेरणा देतात, तुम्हाला त्यांच्या कळपात नेतात. त्यानंतर तुम्ही तुमच्या डोक्याने विचार करायचे बंद करता. टोळीचा विचार, तो तुमचा विचार होऊन जातो. जाती-धर्मांच्या संघटना पूर्वी कधी नव्हे एवढ्या सध्या सक्रीय आहेत. कारण त्यांना त्यांचा धर्म आणि जात बुडण्याची भीती वाटू लागली आहे. डायनॉसॉर नष्ट होताना जसे गदारोळ करीत होते. तसा या धर्म-जाती संघटनांचा गदारोळ सुरू आहे. दिवा विझण्यापूर्वी भडकत असतो, तसे त्यांचे झाले आहे. कितीही अमिषे मिळाली, कितीही जबरदस्ती झालीतरी मित्रांनो, जाती-धर्म संघटनांपासून चार हात लांब राहणे हेच अंतिमतः तुमच्या हीताचे राहील.

राजकीय पुढारी आणि राजकीय पक्षांचा तुमच्यावर डोळा आहे. त्यांपासूनही सावध राहा. एकेकाळी राजकीय पक्षांची ध्येय-धोरणे असायची. आता तसे काही राहिलेले नाही. पुढाऱ्यांची सत्ताकांक्षा हेच त्यांचे राजकारण झाले आहे. समाजाचे प्रश्न, त्यांची सोडवणूक ह्या गोष्टी केवळ वरवरच्या बोलण्यापुरत्या असतात. पुढाऱ्यांना निवडणूक जिंकायची असते. सत्तेची मुख्य स्थाने काबिज करायची असतात. ते त्यांच्या मतलबासाठी तुमचा वापर करून घेतात. 'राजकारणात युवकांनी आले पाहिजे' असे म्हणणारे पुढारी पाहा. ते कधी त्यांची पदे सोडतात का? जेव्हा सत्तेचे वाटप करायचे असते तेव्हा ते आपल्या कुटुंबातील माणसाचीच निवड करतात. अशा वेळेस नवतरुणांचा कोणीच विचार करीत नाही. सध्याचे राजकारण हे धंदेवाईक पद्धतीने चालते. जळत्या घरातून जे हाती लागेल ते लुटून नेले जाते तसे राजकीय पक्ष आणि पुढारी सत्तेच्या तिजोरीवर गडपा मारण्यासाठी अधीर बनलेले दिसतात. उद्या खरोखरीच खुली व्यवस्था आली तर आपल्या हाती काहीच लागणार नाही, म्हणून ते उतावीळ झाले आहेत. त्यात ध्येयवाद राहिलेला नाही. तुमच्यासारख्या तरुणांनी राजकीय पुढाऱ्यांपासून फटकून राहिलेलेच चांगले.

झटपट मोठे व्हावे वाटण्याचा मोह हे देखील नव्या काळात तुमच्या वाटचालीला बाधा ठरू शकतो. आपण मोठे व्हावे, श्रीमंत व्हावे, कीर्तीवान व्हावे हे वाटणे गैर नाही. परंतु हे झटपट व्हावे असे वाटणे मात्र चूक आहे. अपायकारक आहे. आपल्याकडे गडगंज पैसे यावेत, मित्रांसोबत आपणही बारमध्ये जाऊन पैसे उधळावेत, महागा मोलाचे कपडे घालावेत, यासाठी मी काहीही करायला तयार आहे, असे ज्याविषयी तुम्हाला वाटेल त्याविषयी तुमचा पाय घसरला आहे हे लक्षात घ्यावे.

आयुष्य तुमचे आहे. ते कसे जगायचे हे ठरविण्याचा अधिकार तुमचा आहे. हे खरे असेलतरी आईवडिलांच्या जीवावर व्यसन करणे, चैन करणे, प्रेम करणे, विवाह करणे किंवा मौजमजा करणे समर्थनीय ठरत नाही. तुम्ही आधी कमवते व्हा, त्यानंतर काय करायचे असेल ते खुशाल करा. बांडगुळ राहू नका. किमान बांडगूळ असताना मिरवूतरी नका. कमवते झाल्यावर कोणाला भीऊ नका. शेतकरी, स्त्रीया, शास्त्रज्ञ आणि कलावंत हे चार घटक उत्पादक आहेत. या सर्जकांचा सन्मान करायला शिका!

मित्रांनो, मला हे माहीत आहे की, कवडीची अक्कल नसलेले अनेक बांडगूळ तुमच्या अवतीभोवती ऐषआरामी जीवन जगत आहेत. मला हेही माहीत आहे की, आजच्या समाजात इमानदारी, सचोटी, मेहनत यांना फारसे महत्त्व उरलेले नाही. भ्रष्ट मार्गाने पैसे ओरपणाऱ्यांची चलती आहे. पण थोडे थांबा, डोळे उघडून पाहा. आयुष्यात कधीही बेईमानी न केलेले कितीतरी लोक आज खाजगी क्षेत्रात मोठमोठ्यापदावर विराजमान झालेले आहेत. परदेशात जाऊन कामे करणारे लोक स्वाभिमानाने पैसा कमवित आहेत. भ्रष्ट मार्गाने मिळालेली भाकर सगळ्यांनाच पचते असे नाही. परंतु इमानदारीची कमाई मात्र सर्वांच्या हिताची ठरते.

मित्रांनो, येता काळ सरकारी कृपेचा असणार नाही. मक्तेदारी संपुष्टात येणार आहे. ज्यांच्यात गुणवत्ता आहे तेच टिकतील. त्यांचीच सरशी होणार आहे. कालपर्यंत जो गाळ वर आला होता, तो आता तळाशी जाऊन बसू लागला आहे. तुम्ही नितळ राहीला तरच वरती राहाल. मित्रांनो, यशाला शर्टकट नसतो. कोणी काहीही म्हणो, सत्य, प्रामाणिकपणा आणि कष्टाशिवाय यशाचे शिखर ना कोणाला कधी गाठता आले, ना यापुढे कोणी गाठू शकेल.

दोस्तहो, तुमच्या अवतीभोवती मायाजाल पसरलेला आहे. यातून सहीसलामत पुढे जायचे असेल तर एकच हत्यार काम करू शकते. ते म्हणजे, तुम्हाला पडलेले प्रश्न! प्रश्न पडणे हेच जिवंतपणाचे लक्षण आहे. ज्यांना प्रश्न पडत नाहीत त्यांची नाडी बंद पडली आहे, असे समजावे. तुम्हाला प्रश्न पडावेत. त्या प्रश्नांच्या उत्तरासाठी तुम्ही बेचैन व्हावे. अशाच एखाद्या प्रश्नाचा पाठपुरावा करीत तुमच्या आयुष्याला आकार यावा. तेच सार्थक जगणे. बाकी सब झूट. जात धर्माचे सापळे असो, राजकारणाचे जाळे असो की झटपट मोठे होण्याची लालसा असो, या समस्यांच्या अंधारातून मार्ग काढण्यासाठी तुम्हाला पडलेले प्रश्न हेच दिव्याचे काम करतील. कोणत्याही संभ्रमातून तुमची ते सोडवणूक करतील.

तुमच्या उज्वल उद्यासाठी माझ्या मनःपूर्वक शुभेच्छा!


**अमर हबीब**

अंबर, हाऊसिंग सोसायटी,


अंबाजोगाई- ४३१५१७ (जि.बीड)

मो. ९४२२९३१९८६


■■

# दुराग्रहात फसला लोकपाल आणि टीमअण्णाचा गाडा

> टीम अण्णाने हे विधेयक पारित करण्यासाठी भाजपचे मन वळविले असते वा त्या पक्षावर दबाव आणला असता तर सर्व अडथळे पार करून राज्यसभेत हे विधेयक पारित झाले असते. पण अण्णा टीमने तसे केले नाही. म्हणूनच सरकार आणि त्याच्या सहकारी पक्षांना इच्छा शक्ती नसण्याचा जो दोष ही टीम देत आहे त्या दोषाचे धनी स्वतः ही टीम देखील ठरते. मात्र हे विधेयक पारित झाले असते तर निःसंदेहपणे याचे संपूर्ण श्रेय टीम अण्णाला गेले असते आणि मुंबईतील फजिती नंतरही एक राजकीय ताकद म्हणून टीम कडे सन्मानाने पाहिले गेले असते.



**सुधाकर जाधव**

सरते वर्ष गाजले ते केंद्र सरकार आणि अण्णा हजारे यांच्या नेतृत्वाखालील टीम अण्णाच्या संघर्षाने. या संघर्षात एकमेकावर कुरघोडी करण्याची आणि एकमेकांना पाण्यात पाहण्याची संधी दोघानीही सोडली नाही. खरा तर हा वाघ-बकरीचा संघर्ष होता. संघर्ष सुरु होण्या आधी जनता बकरीच्या रुपात वावरत होती,तर सरकारकडे वाघ नखांची कमी नव्हती. पण जसजशी मोठमोठ्या भ्रष्टाचाराची प्रकरणे उघडकीस येवू लागले तसे सरकारी वाघाचे रुपांतर शेळीत झाले तर शेळपट बनलेल्या सरकारच्या वाघ नखावर टीम अण्णाने ताबा मिळवून त्याचा वापर करून शेळपट सरकारला आपला जीव वाचविण्यासाठी तोंड लपवायला भाग पाडले. शेवटी घायकुतीला आलेल्या सरकारने टीम अण्णाला त्यांना पाहिजे असलेला लोकपालचा नजराणा देवून बदल्यात वाघनखे परत मिळविण्याचा घाट घातला. सरकारकडे असलेली वाघनखे म्हणजे जनतेची ताकद आहे याचा विसर सरकारला पडल्याने जनतेवरच वाघ नखांचे ओरखाडे सहन करण्याची पाळी आली होती. म्हणूनच जनतेने सरकारला दिलेली ताकद काढून टीम अण्णाच्या हातात सोपविली होती आणि या ताकदीच्या बळावर टीम अण्णाने सरकारला शरण येण्यास भाग पाडले होते. पण जसा सरकारचा समज झाला होता की जनतेने आम्हाला कौल दिला आहे म्हणून आम्ही काहीही करू शकतो नेमका तसाच समज टीम अण्णाने सुद्धा करून घेतला. सगळी जनता आमच्या पाठीशी आहे म्हणून आम्ही म्हणतो आणि सांगतो तसेच घडले पाहिजे अशी सरकार सारखीच मनमानी टीम अण्णाने सुरु केली. आमची भूमिका अंतिम सत्य आहे आणि त्यात तडजोड नाही की चर्चा नाही अशी टोकाची भूमिका घेवून शरणागत शेळपट सरकारला लाथाडायला सुरुवात केली . मेलेल्याला मारणे जनतेला पसंत नसते याचे भान टीम अण्णाला राहिले नाही. आधी सरकार ज्या मग्रुरीने वागत होते ती मग्रुरी मोडून काढण्यासाठी लोकांनी टीम अण्णाला बळ दिले होते ,पण या बळावर टीम अण्णा मग्रूर होवू लागताच जनतेने दिलेले बळ काढून घेतले. सरकारला जशी मग्रुरी भोवली तशीच ती टीम अन्नालाही भोवली. वर्षाच्या शेवटी सरकार आणि टीम अण्णा यांनी समान कारणासाठी आपापली फजिती करून घेतली आहे. त्यांच्या फजितीची एरवी दखल घेण्याचे कारण नव्हते , पण यांच्या फजितीला कारणीभूत ठरलेली मनमानीच वर्ष सरताना आकारात येत असलेल्या लोकपाल विधेयकातील प्रमुख अडसर ठरली आहे.

लोकपाल विधेयक का अडले ?

लोकपाल विधेयक राज्यसभेत पारित का होवू शकले नाही या बाबत संबंधित पक्ष , गट आणि सरकार यांनी आपापल्या सोयीची कारणे पुढे केली आहेत. लोकपाल साठी सुमारे वर्षभरा पासून आक्रमक असलेल्या टीम अण्णाने व टीम अण्णात ही आक्रमकता येण्यास कारणीभूत असलेल्या तरुणाईला याच्या मागे राजकीय पक्षांचे आणि प्रामुख्याने सरकार व सरकार पक्षांचे कारस्थान कारणीभूत असल्याचे वाटते. टीम अण्णा आणि त्यांच्या मागे असलेल्या तरुणाईची जेवढी राजकीय समज आहे त्याला अनुरूप असा हा निष्कर्ष आहे. लोकपाल म्हणजे सरकारातील लोकांच्या पायावरच धोंडा असल्याने ही मंडळी तो साकार होवू देणार नाही यावर यांची आंधळी निष्ठा. त्यामुळे लोकपाल येवू घातलेला असतानाही दिसणारे सत्य नाकारण्याकडे टीम अण्णा आणि त्यांच्या अविचारी समर्थकांचा कल राहिला आहे. या आंधळेपणाचा एवढा प्रभाव त्यांच्यावर राहिला आहे की त्यामुळे येवू घातलेले विधेयक हे जनतेने दिलेल्या पाठिंब्याच्या आधारे आपणच केलेल्या प्रयत्नांना लाभलेले हे फळ आहे , आंदोलनाच्या यशाची ही पावती आहे हे सत्य त्यांना आजही पचनी पडलेले नाही. म्हणूनच संसदेत बसलेले चोर कसले लोकपाल विधेयक पारित करतात या समजुतीच्या कोषातून टीम अण्णा आणि त्यांचे कडवे आणि कडवट समर्थक बाहेर पडूच शकले नाही. त्याच मुळे हा कसला लोकपाल , हा तर जोकपाल किंवा डाकपाल अशा शब्द जंजाळात टीम अण्णा दिग्भ्रमित झाली. पण लोकपाल या कल्पनेला जे अभूतपूर्व जन समर्थन लाभले आणि टीम अण्णाने हे जन समर्थन प्रकट स्वरुपात मांडण्यात जे यश मिळविले त्यामुळे आता लोकपाल ही काळ्या दगडावरची रेघ ठरली आहे . माझ्या सारख्या सामान्या पासून ते अनेक थोर विचारवंतांचा आणि कार्यकर्त्यांचा या संकल्पनेला प्रखर विरोध असला तरीही लोकपालला मूर्तरूप येण्या पासून कोणीही रोखू शकत नाही अशी राजकीय अनिवार्यता आता निर्माण झाली आहे. आणि अशी राजकीय अनिवार्यता निर्माण करणारेच राजकीय दृष्ट्या अपरिपक्व असल्याने स्वतःच्या यशावर अपयशाचे पांघरून आपल्याच हाताने ओढून घेत आहेत. टीम अण्णाच्या मुंबई आंदोलनाच्या अपयशाचा हाच अन्वयार्थ आहे. टीम अण्णाची राजकीय समजूत मुळातच तोकडी असल्याने आणि देशातील सामाजिक - राजकीय परिस्थितीचे आकलन होणे ही त्यांच्या आवाक्या बाहेरची गोष्ट आहे हे त्यांच्या जन लोकपाल विधेयकाने आणि त्या विधेयका साठीच्या हट्टाने सिद्ध झाले आहे. या हट्टानेच खरे तर टीम अण्णाचा विजय पराभवात परिवर्तीत झाला आहे. राज्यसभेत लोकपाल विधेयक अडले ते टीम अण्णाचा हट्ट पूर्ण करण्याचा अट्टाहास सरकारने

धरला म्हणून !

राज्यसभेतील अपयशाचा पाया लोकसभेत

टीम अण्णाच्या दबाव आणि दुराग्रहापुढे झुकून सरकारने घाई घाईत विधेयक आणल्याने त्यात अनेक त्रुटी राहणे अपरिहार्य होते. केवळ टीम अण्णा म्हणते म्हणून याच अधिवेशनात दूरगामी परिणाम करणारे विधेयक पारित करण्याची सरकारला झालेली घाई ही सरकारने स्वतःचा आत्मविश्वास गमावल्याचे द्योतक होते. हे विधेयक म्हणजे सरकारला स्वतःच्या भवितव्यासाठी टीम अण्णाला खुश करण्याची केविलवाणी धडपड होती हे लपून राहिलेले नाही. अन्यथा टीम अण्णाची मागणी नसताना सरकारने सैन्याला लोकपालच्या कक्षेत टाकले नसते. सरकारची ही घोडचूक लालू प्रसाद यादवांनी लक्षात आणून दुरुस्त करायला लावली हे लालू प्रसादाना जोकर ठरविणारे लक्षात घेणार नाहीत पण सत्य हेच आहे. पंतप्रधाना प्रमाणेच लोकांनी निवडून दिलेल्या संसदेच्या अध्यक्षांना लोकपालला उत्तरदायी ठरविण्याचा आगाऊपणा सरकारने करून ठेवला होता. लोकपालला अधिकार प्रदान करण्याच्या बाबतीत सरकार टीम अण्णाच्या एक पाऊल पुढे होते. जागृत सदस्यांनी संसदेच्या पीठासीन अधिकाऱ्यांना लोकपालच्या दवानीतून सोडविले नसते तर विधेयकात ही अनर्थकारी तरतूद राहून गेली असती. शेळपट सरकारने पंतप्रधानाला लोकपालच्या दावणीला बांधून टीम अण्णाला खुश करण्यात कोणतीच कसर बाकी ठेवली नाही. अशाच प्रकारे सरकारने केंद्रीय कायद्यातून राज्यावर लोकायुक्त नेमण्याचा आग्रह बहुमताच्या जोरावर रेटला आणि येथेच राज्यसभेत हे विधेयक पारित होण्याची शक्यता संपुष्टात आणली. राज्यसभेत सरकारचे बहुमत नसल्याने या तरतुदीला ठाम विरोध असणारे पक्ष -विशेषतः प्रादेशिक पक्ष आहे त्या स्वरुपात विधेयक पारित होवू देतील याची सुतराम शक्यता नव्हती. पण लोकायुक्त केंद्रीय कायद्या द्वारे नेमण्याचा सरकारने जो हट्ट रेटला त्यामागे टीम अण्णाची मागणी पूर्ण करण्या सोबत राज्यावर अंकुश ठेवण्याचा अंतस्थ हेतूही होता. म्हणूनच प्रणव मुखर्जी सारख्या वरिष्ठ नेत्याने 'सेन्स ऑफ हाउस' म्हणून पारित न झालेला ठराव पारित झाल्याचे सांगून आता मागे फिरून अण्णा आंदोलनाचा विश्वासघात करता येणार नाही असा पवित्रा घेतला आणि रेटून ठराव पारित करून घेतला होता. पण कॉंग्रेसचेच अभिषेक सिंघवी यांनी असा कोणताच ठराव पारित झाला नसल्याचे राज्यसभेत खरे काय ते सांगून टाकले. पण सरकारच्या लोकसभेतील भूमिकेचे उट्टे सर्व राजकीय पक्षांनी राज्यसभेत हा ठराव रोखून काढले. टीम अन्नाचा देशाची संघराज्याची रचना समजून न घेता केलेला दुराग्रह आणि या दुराग्रहापुढे सरकारने मान झुकविल्याने लोकपाल तर लांबणीवर पडलाच पण सरकारने स्वतःचे हसे करून घेतले. पण सरकारचे स्वतःला हास्यास्पद करून घेतल्यावर डोळे उघडले आहेत. त्यामुळे आता जेव्हा पुन्हा राज्यसभेत हे विधेयक चर्चेला येईल तेव्हा टीम अण्णा ची दुराग्रही तरतूद काढून टाकण्या शिवाय सरकार समोर पर्याय असणार नाही. टीम अण्णाने मात्र या पासून काहीच बोध न घेता लोकायुक्ताचा केंद्रीय कायद्यात समावेश केलाच पाहिजे असा दुराग्रह चालू ठेवला आहे. याचा अर्थ टीम अण्णाने मुंबईतील फसलेल्या आंदोलना पासून बोध घेतला नाही असाच होतो. राज्यसभेत लोकपाल विधेयक पारित न होण्यास आपला दुराग्रहसुद्धा जबाबदार आहे हे टीम अण्णाच्या गांवी नसल्याने ते सरकार , कॉंग्रेस पक्ष व अन्य काही पक्षावर खापर फोडून समाधान मानीत आहे. तर दुसरीकडे सरकार भारतीय जनता पक्षाला जबाबदार धरून आपली चूक झाकीत आहे. भाजप हा विरोधी पक्षच आहे . सरकारी विधेयक पारित करण्याची त्याच्यावर जबाबदारी टाकणे हा सत्ता पक्षाचा राजकीय कांगावा आहे. भाजप चे राज्यसभेतील नेते अरुण जेटली यांनी सरकारने केंद्रीय कायद्यात लोकायुक्ताच्या तरतुदीचा आग्रह धरला नसता तर राज्यसभेत विधेयक पारित झाले असते अशी प्रतिक्रिया दिली आहे हे सरकार व टीम अण्णा यांनी लक्षात घेतले पाहिजे. तसेच विधेयक पारित न होण्यासाठी राज्यसभेत अवघे दोन सदस्य असलेल्या लालू यादवच्या पक्षाला यासाठी जबाबदार धरणे ही टीम अण्णाची बौद्धिक दिवाळखोरी आहे. सरकार आणि टीम अण्णा प्रमाणेच आपलेच म्हणणे खरे करून दाखविण्याचा स्वभाव असलेल्या ममता बैनर्जीचा विधेयक रोखून धरण्यातील वाटा मात्र सर्वानीच दुर्लक्षित केला आहे. ममताच्या पक्षाने राज्यसभेत घेतलेली भूमिका चुकीची नव्हती , पण लोकसभेत ही भूमिका न रेटण्याच्या चुकीनेच राज्यसभेत आडकाठी आली. अशाही परिस्थितीत टीम अण्णाने हे विधेयक पारित करण्यासाठी भाजपचे मन वळविले असते वा त्या पक्षावर दबाव आणला असता तर सर्व अडथळे पार करून राज्यसभेत हे विधेयक पारित झाले असते. टीम अण्णा सरकार आणि त्याच्या सहकारी पक्षांना इच्छा शक्ती नसण्याचा जो दोष देत आहे त्या दोषाचे धनी स्वतः टीम अण्णा ठरते. खरा तर या बाबतीत सर्वाधिक गोंधळ टीम अन्नाचा होता. लोकसभेत हे विधेयक पारित झाल्या नंतर राज्यसभेने हे विधेयक फेटाळून लावावे ही टीम अण्णाची इच्छा लपून राहिली नव्हती. मात्र राज्यसभेत विधेयक पुढे ढकलले गेले तेव्हा मात्र टीम अण्णांनी राजकीय पक्ष व संसदेच्या कार्य पद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत आपल्या गोंधळाचे आणि संसदीय लोकशाही बद्दलच्या आकसाचे दर्शन घडविले.

अण्णा आंदोलनाचे भवितव्य

लोकपाल विधेयक राज्यसभेत पारित झाले असते तर सरकारला श्रेय मिळून सरकारची विश्वासार्हता वाढली असती असे म्हणणे धाडसाचे ठरेल. मात्र हे विधेयक पारित झाले असते तर निःसंदेह पणे याचे संपूर्ण श्रेय टीम अण्णाला गेले असते आणि मुंबईतील फजिती नंतरही एक राजकीय ताकद म्हणून टीम कडे सन्मानाने पाहिले गेले असते. पण येथेही टीम अन्नातील राजकीय अपरिपक्वता , दुरदृष्टीचा अभाव, आणि एखाद्या लहान मुलाने आपल्या आवडत्या खेळण्यासाठी आकांत करावा तसा जन लोकपाल साठीचा बालिश हट्ट , दुराग्रह आणि आपल्यालाच अंतिम सत्य गवसल्याचा प्रेषिताचा अविर्भाव यामुळे टीम अण्णा पासून लोकच दुर गेले नाहीत तर मिळालेले यश ही दुर गेले आहे. पण टीम अण्णाने अपयशी होणे याने कोणाला आनंद होत असेल तर त्याच्या इतका उथळ लोकशाहीवादी कोणी असू शकत नाही. टीम अण्णा अपयशी होणे म्हणजे लक्षावधी जनतेची घोर निराशा होणे आहे. म्हणूनच टीम अण्णा आणि अण्णा आंदोलनाचा सार्थ कारणासाठी विरोध करणाऱ्यांनी सुद्धा जनतेची निराशा टाळण्यासाठी टीम अन्नावर बदलण्या साठी दबाव आणला पाहिजे. सध्याच्या टीम च्या मर्यादा स्वतः अण्णा हजारे यांच्या लक्षात आल्या आहेत. ही टीम अधिक व्यापक व प्रातिनिधिक करण्याचा त्यांचा आग्रह त्यांनी जाहीरपणे मांडला आहे. पण विचार सोबतच अण्णाच्या वयाच्या व संपर्काच्या मर्यादा आहेत. त्यांना यासाठी दुसऱ्यांच्या मदतीची गरज नेहमीच असते. पण आज जे अण्णाच्या मदतीची भूमिका निभावत आहेत तेच टीम अण्णाचा विस्तार करण्यास इच्छुक नाही आहेत. अन्यथा अण्णांनी इच्छा जाहीर करताच त्याला मूर्त स्वरूप देण्याचा प्रयत्न सुरु झाला असता. या टीम मध्ये मेधा पाटकरांचा अपवाद

सोडला तर अगदी अण्णा सहित कोणालाही जन आंदोलनाचा अनुभव नाही. आंदोलनाचे तत्वज्ञान सुद्धा नाही. मग उरते त्यांच्याकडे ते त्यांना साक्षात्कार झालेले जन लोकपाल सारखे अंतिम सत्य! आणि हे सत्य सर्वानी मान्य केले पाहिजे हा हट्ट आणि आग्रह. आणि हा हट्ट सहजासहजी ज्यांच्या गळी उतरत नसेल तर त्यांना नामोहरम करण्यासाठी अविचारी आणि अविवेकी टोळक्याना स्थान आणि महत्व देणे हे ओघाने येते. आज अण्णा आंदोलनावर अशाच टोळक्यांचा आणि टाळक्यांचा प्रभाव आहे. अशी टोळकी सोशल नेटवर्किंगवर नाझींच्या थाटात वावरत असतात. मैदानात आणि मोर्च्यात यांच्याच आवाजाला स्थान असते. राजकारणात जसे सज्जनांना स्थान नाही तसेच अण्णा आंदोलनातही सज्जनाचे कोणी ऐकत नाही. पण सज्जनाचा सहभाग असल्याशिवाय आंदोलन चालत नाही हा मुंबईतील अण्णा आंदोलनाचा धडा आहे. म्हणूनच ही टीम मोठी आणि व्यापक होणे आंदोलन पुढे नेण्यासाठीच नाही तर आंदोलन जिवंत ठेवण्यासाठी सुद्धा गरजेचे आहे.

---

# संघाने केला अण्णासंघ गारद

**अनायासे भाजपचा राजकीय फायदा होण्याची परिस्थिती निर्माण झाल्याने आणि एकाधिकारवादी जनलोकपाल येण्याची शक्यता मावळल्याने टीम अण्णाच्या लाथा खाऊन आंदोलनात राहण्यापेक्षा बाहेर पडून टीम अण्णाला आपल्या शक्तीचे भान करून देणारा मार्ग राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने पत्करला. मुंबईत संघाच्या या भूमिकेचा परिणाम दिसून आला. संघाशी संबंध असल्याच्या कारणावरून बाबा रामदेव यांना आंदोलनापासून दूर ठेवणाऱ्या टीमअण्णाला बाबा रामदेवसाठी पायघड्या टाकायला लावून संघाने आपल्या शिवाय अण्णांचे आंदोलन चालू शकत नाही हे दाखवून दिले आहे.**

अण्णांचे वय आणि प्रकृती लक्षात घेता त्यांनी काही काळ आंदोलनातून बाजूला होणे हे जितके स्वाभाविक आहे तितकेच अण्णांच्या पराक्रमी टीमने अण्णांच्या प्रकृतीचे कारण पुढे करून माघार घेणे हे अनपेक्षित आणि अस्वाभाविक आहे. अण्णांना इस्पितळात दाखल करून उर्वरित टीमला मुंबईचा कार्यक्रम एक दिवस पुढे चालवून ठरल्याप्रमाणे समाप्त करता आला असता; पण मध्येच कार्यक्रम गुंडाळून टीमअण्णाने स्वत:चे अवसान गळाल्याचे दाखवून देऊन एकीकडे आंदोलन समर्थकांचा अवसानघात केला तर दुसरीकडे आपल्या विरोधकांचे आणि टीकाकारांचे अवसान वाढविले. ज्यांची स्मरणशक्ती ठीकठाक असेल त्यांना हेही आठवत असेल की दिल्लीच्या रामलीला मैदानातील उपोषणा दरम्यानसुद्धा अण्णांची प्रकृती बिघडली होती आणि तरीही अण्णांनी उपोषण पुढे रेटले होते आणि टीमअण्णाने त्यांना उपोषण सोडण्याचा अजिबात आग्रह केला नव्हता. शेवटी सरकार आणि संसद यांना मुत्सदीपणा दाखवून अण्णांना उपोषण सोडायला लावून त्यांची प्रकृती जास्त बिघडू दिली नव्हती. दिल्लीत टीमअण्णाने अण्णांना उपोषण सोडण्याचा आग्रह न करणे आणि सरकारने उपोषण सुटावे म्हणून अगतिक होऊन प्रयत्न करणे यामागे त्यावेळी प्रकट झालेली लोकशक्ती होती. या लोकशक्तीच्या बळावर टीमअण्णाने अण्णांच्या उपोषणाला हत्यार बनवून सरकारला नाचविले आणि झुकविले होते. टीमअण्णाची ताकद आणि अवसान ही लोकशक्ती होती. मुंबई आंदोलनाच्या वेळी या लोकशक्तीचे दर्शन मुंबईतच नव्हे तर देश पातळीवर कोठेच घडले नाही. ज्या रामलीला मैदानाने अण्णा आंदोलनाला ऐतिहासिक बनविले, जगात मान आणि स्थान मिळवून दिले त्या मैदानात एका कोपऱ्यात शे-दोनशे लोकांना घेऊन बसण्याची पाळी टीम अण्णाचे प्रमुख सदस्य असलेल्या भूषण पिता-पुत्रावर आली. आपण दिल्लीत गेल्याने गर्दी जमेल या भ्रमात असलेल्या टीम अण्णाच्या बहुचर्चित सदस्या किरण बेदी यांनी मुंबईहून दिल्लीला विमानझेप घेतली; पण त्यांच्या तेथे जाण्यानेही काहीच फरक पडला नाही. अवघ्या ३-४ महिन्यांच्या काळात शिखरावर असलेले जनसमर्थन पायथ्यापर्यंत घसरल्याने अण्णा आंदोलनाची घसरण हा अण्णांच्या जंतरमंतर व रामलीला मैदानाच्या आंदोलना इतकीच चर्चेचा विषय बनली आहे. टीमअण्णाचे काय चुकले याचे विश्लेषण आंदोलनाचे विरोधकच नाही तर समर्थकसुद्धा करीत आहे. विश्लेषण करणारे विरोधी असोत, समर्थक असोत किंवा तटस्थ असोत, या तिघांचेही जनसमर्थनात टीमअण्णा वाहवत गेली यावर एकमत आहे. जे काही टीमअण्णाचे यश आहे ते त्यांचे कर्तृत्व नसून लाभलेल्या जनसमर्थनाचे यश आहे आणि ते समर्थन टिकविणे व वाढविणे अंतिम यशासाठी आवश्यक आहे याचे भान टीमअण्णाला राखता आले नाही. मिळालेले यश मुठीत पकडून ठेवण्याऐवजी डोक्यात शिरू दिल्यानेच टीम अण्णापासून आंदोलनात सामील अनेक घटक दुरावलेत व परिणामी जनसमर्थन कमी कमी होत गेले यात शंका नाही. याचा अर्थ अण्णा आंदोलनाच्या यशापयशाची चिकित्सा जनसमर्थन लाभले कसे आणि ओसरले कसे याचा विचार केल्याशिवाय पूर्ण होऊ शकत नाही; पण सध्या या आंदोलनावर जी चर्चा होत आहे त्यात या मुद्द्याचा गांभीर्याने विचार होताना दिसत नाही.


जन समर्थन लाभले कसे?

अण्णा आंदोलनाची सारी सूत्रे स्वयंसेवी संस्था आणि या संस्थांच्या प्रमुखांच्या हाती होती. अरविंद केजरीवाल, किरण बेदी, स्वामी अग्निवेश आणि संचालन समितीतील बहुतांश मंडळी संस्था चालविणारीच होती. अगदी अण्णा हजारेदेखील याला अपवाद नाहीत. आजपर्यंत ही मंडळी जे काम करीत होती त्याला चळवळ असे नाव देत असले तरी त्यात लोक सहभाग नेहमीच मर्यादीत राहत आला. या चळवळीच्या अनेक नेत्यांचा म्हणजे टीमअण्णाच्या अनेक सदस्यांचा लोकांना या आंदोलनातूनच पहिल्यांदा परिचय झाला आहे. सीमित क्षेत्रात सीमित लोकांत काम असे स्वरूप त्यांच्या कामाचे होते. गेल्या २० वर्षांपेक्षा अधिक काळापासून

स्वतः अण्णा हजारे भ्रष्टाचार निर्मूलनाच्या आघाडीवर सक्रीय आहेत; पण त्यांची सक्रियता व लढा हा नेहमीच वैयक्तिक स्वरूपात राहत आला आहे. त्यांनी एकट्याने उपोषण करून महाराष्ट्रात आपल्या मागण्याही मान्य करून घेतल्या आहेत; पण जनलोकपालसाठी उभे राहिलेले आंदोलन हे त्यांच्या नेतृत्वाखाली उभे राहिलेले एकमेव जनआंदोलन आहे. मुख्य म्हणजे अण्णांनी महाराष्ट्रात जनसंपर्क कायम वाढविला आणि राखला तरी हा लोकसंग्रह त्यांनी कधी जनआंदोलनात परिवर्तीत करण्याचा प्रयोग केला नव्हता. टीमअण्णा मधील इतर सदस्यांनी तर कधी असा लोकसंग्रह केलाच नाही. यांची कामे हवाईच राहत आल्याचे किरण बेदीच्या हवाई प्रवासाची जी चर्चा झाली त्यावरून सर्वांच्या लक्षात आलेच आहे. तरीदेखील ज्यांनी जन चळवळी संघटीत करण्यात आणि चालविण्यात हयात घालविली त्यांना टीमअण्णाच्या नेतृत्वाखाली झालेल्या आंदोलना इतके काय पण त्याच्या पासंगाला पुरेल इतकेही यश लाभले नाही. म्हणूनच टीमअण्णाला लाभलेले जनसमर्थन अचंब्यात टाकणारे आहे. असे समर्थन लाभण्यामागे अनेक कारणे आणि निमित्त पुढे केली जात आहेत. ती खरी असली तरी पुरेशी नाहीत हे लक्षात घेतले पाहिजे. हे आंदोलन उभे करण्यात आणि फैलावण्यात माध्यमांची भूमिका महत्त्वाची राहिली हे अण्णांचे म्हणणे खरे आहे. आंदोलनाच्या नेत्यांनी सर्व आधुनिक संपर्क साधनाचा सर्व शक्तीनिशी व पूर्ण क्षमतेने वापर केला हे वास्तव आहे. याच मुळे उघडकीस आलेली भ्रष्टाचाराची अनेक प्रकरणे अतिशयोक्त व भडक स्वरुपात लोकांच्या डोक्यात शिरवून लोकाची माथी भडकविणे मोठ्या प्रमाणात शक्य झाले. ज्या दूरसंचार घोटाळ्याचा उपयोग आंदोलन पेटविण्यासाठी झाला त्या दूरसंचार साधना मुळेच आंदोलन सर्वतोमुखी करता आले; पण हे सगळे खरे असले तरी यामुळे आंदोलनाची वातावरण निर्मिती होते, आंदोलनाला अनुकूलता निर्माण होते. पण प्रत्यक्ष आंदोलन उभारण्यासाठी कोणाला तरी पुढाकार घ्यावा लागतो. लोकांना रस्त्यावर उतरविण्यासाठी कोणालातरी घरोघरी संपर्क करावा लागतो. टीम अण्णाजवळ असे कोणतेही संगठन किंवा यंत्रणा नव्हती. ठिकठिकाणच्या स्वयंसेवी संस्थाचा त्यांना आधार होता हे खरे. पण आपल्याकडे या संस्थांच्या कामाची ज्या प्रकारे चर्चा होते त्यावरून भ्रष्टाचार विरोधी आंदोलन उभारण्यास अशा संस्था निरुपयोगी ठरतात. एखाद्या घटनेचे निमित्त होवून लोक अचानक रस्त्यावर उतरतात व त्याचे मोठ्या जनआंदोलनात परिवर्तन होवून मोठी उलथापालथ होते हे जगाने अनेकदा अनुभवले आहे. अगदी या आंदोलनाच्या काही दिवस आधीच अरब राष्ट्रात अशी आंदोलने उभी राहिलीत. तेथे अशी आंदोलने उभी राहण्या मागे विशिष्ठ अशा एखाद्या घटनेकडे अंगुली निर्देश करता येईल. पण जनलोकपालसाठीच्या आंदोलनास अशी एखादी घटना कारणीभूत होवून लोक अचानक रस्त्यावर उतरले अशा तऱ्हेचे हे उत्स्फूर्त आंदोलन नक्कीच नव्हते. हे ठरवून केलेले आंदोलन होते. पण आंदोलनाचा मुद्दा लोकांना भावला आणि रस्त्यावर येण्यासाठी आवाहन करण्यात ज्यांनी पुढाकार घेतला त्यांना लोकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला ही वास्तविकता आहे. लोकांना असे बाहेर काढण्यास कोणी पुढाकार घेतला? याचे खरे उत्तर संघ परिवार असेच येईल. लोकांना बाहेर काढण्यात अनेक ठिकाणी स्थानिक पातळीवर आदर व मान्यताप्राप्त व्यक्ती दिसत असल्या तरी आपण मागे राहून अशा व्यक्तींना पुढे करण्यात, त्यांना बळ पुरविण्याची संघाची कार्यपद्धती राहिली आहे. म्हणूनच हे आंदोलन अनेकांच्या खांद्यावर उभे राहिल्याचे दिसले तरी त्याच्या तळाशी संघ परिवार होता हे प्रत्येक ठिकाणी झालेल्या आंदोलनाचा अभ्यास केला तर हाच निष्कर्ष निघेल. टीम अण्णाने मात्र हे वास्तव लक्षात घेतले नाही किंवा ते लक्षात घेणे सोयीचे न वाटून सोयीस्कर पणे दुर्लक्ष तरी केले. आंदोलन आपण उभे केले आणि लोक आपल्याच मागे आहेत या संभ्रमात राहिल्याने आंदोलनाचा फज्जा उडाला असे आता संघ परिवार उघडपणे बोलू आणि लिहू लागला आहे. टीम अण्णाने राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा आधार नाकारण्याचा प्रयत्न केल्यानेच आंदोलन कोलमडले अशा निष्कर्षाप्रत संघाचे विचारवंत आले आहेत आणि संघ विचारसरणीच्या नियतकालिकात तसे लिखाणही प्रसिद्ध होवू लागले आहे. हा निष्कर्ष चुकीचा ठरविता येईल अशी परिस्थिती नाही. काँग्रेस राजकीय हेतूने बोलत असेल पण या आंदोलना मागे संघ परिवार उभा आहे असे काँग्रेसेतर विरोधकांची देखील धारणा होती आणि त्या धारणेच्या आधारावर या आंदोलनाला प्रखर विरोध झाला आणि होतो आहे हे मान्यच करावे लागेल. आंदोलन विरोधकांची धारणा बरोबर असल्याची पुष्टी स्वतः संघ परिवार करू लागला आहे. त्यामुळेच आंदोलन उभे करण्यामागे ज्या शक्ती कार्यरत होत्या त्यात संघ ही महत्वाची ताकद होती आणि ही ताकद दुर झाल्याने आंदोलन कोलमडले हा निष्कर्ष सहजा सहजी उडवून लावता येणारा नाही. आंदोलनात संघाची ताकद होती हे मान्य केले तरी संघ व टीम अण्णा हातात हात घालून हे आंदोलन चालवीत आहेत हा आंदोलन विरोधकाचा आरोप मात्र ओढून ताणून केल्या सारखा वाटतो. अर्थात यामुळे निष्कर्षात फरक पडत नाही हे खरे.

संघाच्या पुढाकाराची कारणे

संघ भ्रष्टाचारा विरोधात बोलत असला तरी भ्रष्टाचारात लिप्त स्वयंसेवका विरुद्ध कारवाई करण्याच्या भानगडीत संघ कधीच पडलेला नाही. भ्रष्टाचारात एखादा स्वयंसेवक सापडला तर 'स्वयंसेवक नापास झाला' अशी माफक प्रतिक्रिया संघा कडून व्यक्त होत असते. पण भ्रष्टाचारी स्वयंसेवकाला शाखेत येण्यावर बंदी घालण्याची शिक्षा संघाने कधीच कोणत्या स्वयंसेवकाला दिलेली नाही. त्यामुळे भ्रष्टाचार निर्मूलना बाबत संघ गंभीर आहे आणि म्हणून तो या आंदोलनात पुढे आहे असे मानता येत नाही. या चळवळीचा फायदा निवडणुकीत भारतीय जनता पक्षाला व्हावा एवढ्या एका कारणासाठी संघ सर्व शक्तीनिशी उतरला असे म्हणणे चुकीचे नसले तरी एकांगी नक्कीच आहे. संघ आणि संघ स्वयंसेवकांना अण्णा हजारेंचे आकर्षण आहे म्हणून संघ या चळवळीत नक्कीच नाही. मात्र अण्णा आंदोलनाची जन लोकपाल संकल्पना ज्यात एकाधिकारशाहीचे स्पष्ट दर्शन आहे ती संघ विचारसरणीच्या जवळची असल्याने संघ मनापासून या चळवळीत सामील झाला हेच संघ सहभागाचे समर्पक कारण पुढे येते. याच आकर्षणापायी संघाचा आदेश नसता तरी संघ स्वयंसेवक चळवळीच्या दुर राहू शकले नसते. टीम अण्णाची जन लोकपाल संस्थेची रचना आणि आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची एकचालकानुवर्ती संस्था आणि समाज याची संकल्पना यात असलेले साम्य याने टीम अण्णा आणि संघ यांच्यात दुव्याचे काम केले आहे. या दोघांचा संघटनात्मक पातळीवर काही संबंध नसला तरी त्यांची नाळ एकाधिकारवादी एकचालकानुवर्तीत्व संकल्पनेशी जोडलेली आहे. तन मन धनाने संघ या आंदोलनात उतरला तो त्याची ही संकल्पना अण्णा आंदोलनातून आकाराला येण्याची शक्यता निर्माण झाली म्हणून. भाजपा चा राजकीय फायदा ही संघासाठी अग्रक्रमाची नव्हे तर अनुषंगिक बाब होती. संघाची अण्णा आंदोलनाशी जुळलेली नाळ विचाराची आहे किंवा होती असे म्हणता येईल. एकाधिकारशाहीचे किंवा हुकुमशाहीचे आकर्षणच नाही तर वेड असलेले संघेतर समूह या आंदोलनात हिरीरीने आणि आक्रमकपणे सहभागी झाले ते याच कारणासाठी. त्यांना



**लोकांना असे बाहेर काढण्यास कोणी पुढाकार घेतला? याचे खरे उत्तर संघ परिवार असेच येईल. लोकांना बाहेर काढण्यात अनेक ठिकाणी स्थानिक पातळीवर आदर व मान्यताप्राप्त व्यक्ती दिसत असल्या तरी आपण मागे राहून अशा व्यक्तींना पुढे करण्यात, त्यांना बळ पुरविण्याची संघाची कार्यपद्धती राहिली आहे. म्हणूनच हे आंदोलन अनेकांच्या खांद्यावर उभे राहिल्याचे दिसले तरी त्याच्या तळाशी संघ परिवार होता हे प्रत्येक ठिकाणी झालेल्या आंदोलनाचा अभ्यास केला तर हाच निष्कर्ष निघेल.**

त्यांच्या कल्पनेतला शासक जन लोकपालच्या रूपात दिसतो आहे. आंदोलनाचे सगळे संघटक एकाधिकारवादी जन लोकपाल ने भारावलेले तर आंदोलनात सामील सर्वसामान्य जनता भ्रष्टाचाराचा प्रश्न धसास लागेल किंवा मार्गी लागेल या अंधविश्वासापायी आंदोलनाकडे आकर्षित झालेले असा हा तिढा आहे. त्याच मुळे संसदेत आलेल्या लोकपाल विधेयकाने पूर्णपणे नाही तरी काही अंशी भ्रष्टाचाराचा प्रश्न मार्गी लागण्यास मदत होईल यात समाधान मानून सर्व सामान्य लोक आंदोलनापासून बाजूला झाले आहेत, तर आपल्या कल्पनेतील एकाधिकारवादी व एकचालकानुवर्ती जन लोकपाल आणण्यासाठी काहींचे धडपडणे सुरू राहिल्याने आंदोलना बाबत गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यात काँग्रेसने संघाचा आणि टीम अण्णाचा संबंध जोडण्याचा वारंवार प्रयत्न केल्याने टीम अण्णा संघाचे आंदोलनातील योगदान विसरून संघाला सतत झिडकारू लागली. दिग्विजय सिंह हा अण्णा आंदोलनाचा नेहमीच कुचेष्टेचा विषय राहिला आहे. दिग्विजय यांनीच हा मुद्दा वेळोवेळी ताणून धरून टीम अण्णाला संघापासून दुर करण्यात यश मिळविले. अनायासे भाजपचा राजकीय फायदा होण्याची परिस्थिती निर्माण झाल्याने आणि एकाधिकारवादी जन लोकपाल येण्याची शक्यता मावळल्याने टीम अण्णाच्या लाथा खाऊन आंदोलनात राहण्यापेक्षा बाहेर पडून टीम अण्णाला आपल्या शक्तीचे भान करून देणारा मार्ग संघाने पत्करला. भाजपने टीम अण्णाला हवा असलेला एकत्रित लोकपाल व लोकायुक्त कायदा धुडकावून संसदेत ही संघ शक्तीविना अण्णा काहीच करू शकत नाहीत याची जाणीव करून दिली आहे. मुंबईत संघाच्या भूमिकेचा परिणाम दिसून आला व टीम अण्णाला संघशक्तीची आठवण आली. संघाशी संबंध असल्याच्या कारणावरून बाबा रामदेव यांना आंदोलनापासून दुर ठेवणाऱ्या टीम अण्णाला बाबा रामदेव साठी पायघड्या टाकायला लावून संघाने आपल्या शिवाय अण्णांचे आंदोलन चालू शकत नाही हे टीम अण्णाला दाखवून दिले आहे. पण टीम अण्णा काँग्रेस व दिग्विजय सिंह यांनी टाकलेल्या सापळ्यात अडकल्याने त्यांना संघाला जवळ करणे शक्य होत नाही आणि संघाशिवाय आंदोलन चालविणेही अशक्य बनले आहे. टीम अण्णा संभ्रमात आहे असे जे सांगितले जाते तो संभ्रम नेमका हा आहे. यावर दुसरा उपाय होता , पण तो अंमलात आणायचे नाकारून टीम अण्णाने आंदोलनाचे मोठे नुकसान केले आहे. स्वतः अण्णा हजारे यांनीच हा मार्ग सुचविला होता. सध्याच्या टीम ची पुनर्रचना करून सर्वसमावेशक व व्यापक अशी नवी टीम बनविण्याची गरज व इच्छा त्यांनी बोलून दाखविली होती. त्यांची कल्पना प्रत्यक्षात आली असती तर आंदोलनाला स्वतःचे संगठन लाभले असते व संघावर अवलंबून राहण्याची पाळी टीम अण्णा वर आली नसती. पण त्यामुळे आजच्या टीमची म्हणजे केजरीवाल , बेदी आणि भूषण यांची आंदोलनावरील आणि अण्णा वरील पकड सैल झाली असती . नेतृत्वात भागीदार वाढण्याच्या भीतीपायी आजच्या टीम अण्णाने अण्णांच्या आणि आंदोलनाच्या प्रभावाला ओहोटी लावली आहे.

**सुधाकर जाधव**
पांढरकवडा, जि.यवतमाळ मो. ९४२२१६८१५८
ssudhakarjadhav@gmail.com
http://myblog-common-nonsense.blogspot.com/

■■

# जय हो पाध्ये

बाबू सोंगाड्या

युपीए-दोनपासून आमच्यामागे शनीची साडेसातीच लागली. बरं अशा वेळेस शांत राहून शनीची आराधना करायची सोडून आमचे एकेक वाचेवीर आणि विरण्या अशी काही स्टेटमेंट्स द्यायला लागले की, आम्हालाच पळता भुई थोडी व्हायला लागली. आमचेच दिग्गी, सिब्बल, अंबिका, यांना आवरता आवरता नाकी नऊ काय दहासुद्धा यायला लागलेत. कॉमनवेल्थ गेम्स आणि टूजी स्पेक्ट्रम म्हणजे तर मारूतीचं शेपटूच झालंय. किती लांबणार कळत नाही. नाही आम्हाला माहीत आहे याच्या वेटोळ्यात कोण कोण येऊ शकतं ते; पण पब्लिकला आणखी कळलं नाही आम्हाला तर भीती वाटते की हे शेपूट प्रत्यक्ष महाराणी आणि दिवाणजीपर्यंतही पोहचू शकतं. मग तर कॅबिनेटच्या बैठका तिहाडच्या तुरुंगातच घ्याव्या लागतील असं दिसतंय.

(रमेश पाध्ये यांच्या दै. लोकसत्तामधील लेखा संदर्भाने)

इतकं बरं वाटलं म्हणून सांगू तुमचा लेख वाचून. टीकाकारांच्या टीकेच्या आगीत आम्ही होरपळून निघत होतो. कातडी कितीही निबर असली तरी तिच्याही सहनशक्तीला काही मर्यादा ही असतेच. तीही मर्यादा या टीकेनं ओलांडली. आमची अवस्था तर अशी झाली होती.

‘कोई उम्मीद बर नहीं आती,
कोई सूरत नजर नहीं आती ।
पहले आती थी हँसी हाले दिल पर,
अब किसी बात पर नहीं आती ।’

आमच्या या अशा मन:स्थितीत तुमचा लेख थंडगार वाऱ्याच्या झुळुकीसारखा वाटला. कुणी तरी आमची बाजू घेणारा निघाला, म्हणून बरं वाटलं. सध्या शेतकऱ्यांचं डोकं फिरलंय म्हणून ते आम्हाला शिव्या घालतात हे ठीक आहे. ते आज नाही उद्या आमच्या भजनी लागतील. त्यांच्यासाठी आमच्या जातीपातीच्या अफुच्या गोळ्या तयार आहेत; पण आता पावेतो चर्चेवर वांझ फेऱ्या घालणारे बुद्धिजीवी आता रस्त्यावर उतरू पाहत आहेत, ही तर आम्हाला चिंतेची बाब वाटत होती; पण तुमच्या रूपात आम्हाला एक आशेचा किरण दिसला. ज्या अर्थी तुमचा लेख एका मोठ्या वृत्तपत्रात छापला आणि लेखाखाली तुमचं ते ईमेल की काय म्हणतात तोही पत्ता दिलाय त्यावरून तुम्ही नक्कीच बुद्धिजीवी असला पाहिजेत असा विश्वास आहे. शिवाय आकड्यांचा बिनबुडाचा खेळही तुम्ही केलात त्या अर्थी नक्कीच तुम्ही बुद्धिजीवी असला पाहिजेत. म्हणून तुमच्या मताला आमच्या दृष्टीने महत्त्व आहे.

तुमची शिफारस आम्ही एखाद्या पट्टा अॅवॉर्डसाठी नक्की करू. तेही नाही जमलं तर आमचा हक्काचा कृषिभूषण पुरस्कार तर आहेच खैरात वाटायला; पण काय हो, तुम्हाला काही शेती वगैरे आहे का? हो, असं नको व्हायला की, आम्ही तुम्हाला हा कृषिभूषण पुरस्कार द्यावा आणि लोकांनी म्हणावं, शेतीच नाही तर कृषिभूषण पुरस्कार कसा? तसं असलं तर आम्ही आताच नियमावलीत बदल करू आणि शेतीविषयक ज्ञान असणारेही या पुरस्कारासाठी पात्र ठरतील असा नवीन नियम तयार करू. म्हणजे तुम्हाला त्यात फिट बसवता येईल.

आमची अडचण कशी झाली बघा. आमचे धंदे, नाही म्हणजे व्यवहार पूर्वीपासून असाच होता; पण आमच्या बाबतीत व्हायचं काय की सापडत नाही तो पावेतो शिष्टाचार आणि सापडलं तर भ्रष्टाचार असा परिपाठ होता. यूपीए-एक पर्यंत सारं कसं सुरळीत चाललं होतं; पण युपीए-दोनपासून आमच्यामागे शनीची साडेसातीच लागली. बरं अशा वेळेस शांत राहून शनीची आराधना करायची सोडून आमचे एकेक वाचेवीर आणि विरण्या अशी काही स्टेटमेंट्स द्यायला लागले की, आम्हालाच पळता भुई थोडी व्हायला लागली. आमचेच दिग्गी, सिब्बल, अंबिका, यांना आवरता आवरता नाकी नऊ काय दहासुद्धा यायला लागलेत. कॉमनवेल्थ गेम्स आणि टूजी स्पेक्ट्रम म्हणजे तर मारूतीचं शेपटूच झालंय. किती लांबणार कळत नाही. नाही आम्हाला माहीत आहे याच्या वेटोळ्यात कोण कोण येऊ शकतं ते; पण पब्लिकला आणखी कळलं नाही आम्हाला तर भीती वाटते की हे शेपूट प्रत्यक्ष महाराणी आणि दिवाणजीपर्यंतही पोहचू शकतं. मग तर कॅबिनेटच्या बैठका तिहाडच्या तुरुंगातच घ्याव्या लागतील असं दिसतंय.

त्याची तयारी आम्हाला आतापासूनच घ्यावी लागणार आहे. त्यासाठी आधी जेल मॅन्यूअलमध्ये सुधारणा करून आमदार, खासदार, मंत्री यांना त्यांच्या दर्जाप्रमाणे बाहेर ज्या सोयी सवलती उपलब्ध असतात त्या जेलात मिळाव्या अशी तरतूद करण्याचा आमचा विचार चालला आहे. त्यासाठी दिल्ली आणि नोयडाच्या मधे एक जागा पाहून तिथे एअर कंडीशन्ड जेलाची आम्ही तरतूद करून ठेवायचा विचार चालवला आहे. आम्हाला आमच्या भविष्याची तरतूद करून ठेवायला पाहिजे.

हे असं होतं बघा. घाबरल्या मन:स्थितीत आम्ही असेच भरकटत जातो. मूळ मुद्दा असा होता की, तुमच्या त्या लेखामुळे आम्हाला याचा आनंद झाला की, बुद्धिवंतांच्या भिंतीतली एक वीट तुमच्या रूपानं निखळून पडली आहे. आता हळूहळू या भिंतीला खिंडार पडेल, असं बघा. शेतमालाचे भाव वाढले तर आपण शहरवासियांचं कसं व्हावं बरं? आजच या दंडेली करणाऱ्या- पाध्ये साहेब तुम्ही चांगला शब्द सुचवलात- दंडेली नाही तर काय? साखर कारखाने बंद पाडतात म्हणजे काय? -हां तर आजच या दंडेली करणाऱ्यांना नाही रोकलं तर उद्या हे तर आम्हाला ‘बे-घर’ करतील. म्हातारी मेल्याचं दु:ख नाही हो, काळ सोकावतो बघा.

सुरुवात उसानं झाली. त्यात आमचंही जरा चुकलं म्हणा. झालं काय की, घड्याळाची मुजोरी फारच वाढली होती. त्यांच्या हातात साखर कारखाने. त्यांचा सारा जीव या कारखान्यात. म्हणलं त्यांचा गळा थोडा दाबावा. त्यात आम्हाला यश आलं; पण तो डाव आमच्यावर उलटतोय असं वाटतं. आता कापूस पेटायला

सुरुवात झाली. हे प्रकरण मात्र चांगलच शेकणार आमच्या अंगावर.

त्या आंबेठाणवासियाचा असा राग येतो म्हणता. चांगले झोपी गेले होते सगळे. आम्ही म्हणू तिकडे अंगठे लावायचे. बरं चाललं होतं आमचं. त्यांना एकदा गरिबी रेषेच्या खाली लोटलं की, आम्ही आपले त्यांच्या उद्धाराच्या योजना राबवायला तयार. आमचा हात आम आदमी के साथ.सगळेच जर त्या लाईनीच्या वर आले तर आम्ही उद्धार तरी करायचा कुणाचा? तेव्हा चाचापासून प्रेझेंट महाराणीपर्यंत आम्ही बीपीएल वाढत राहील याची काळजी घेण्याचा कार्यक्रम राबता ठेवला. पण मध्येच हे कुठून उपटले कुणास ठाऊक. गेल्या शतकातलं नववं दशक घातक ठरलं. त्याच दशकात त्या आंबेठाणवासियाचा 'शास्त्री' करून टाकला असता तर कुणाला कळलंही नसतं कसा काय खतम झाला ते; पण आमचं दुर्दैवं आमचे पूर्वसुरी भोगून गेले आणि आमच्या नशिबी त्यांचेच शिष्य ठेवले मागे आणि आता तर शेतकऱ्यांना कुणी नेताही लागत नाही. कुणीतरी हाक दिली की, सारे भरारा गोळा होतात आणि 'आगे बढो, हम तुम्हारे'च्या घोषणा देतात.

या एवढ्या कोलाहलात आमचा आवाज मात्र ऐकणारा कुणी नव्हता. तो तुमच्या रूपानं भेटला. काय मुद्दा मांडलाय! जमीन पडीक ठेवायचा काय हक्क आहे शेतकऱ्यांना? तांदूळ पिकवीत नाहीत म्हणजे काय? अरे उद्या पंजाब, हरयाणा, मध्यप्रदेशनं ठरवलं क्रॉप हॉलिडे घ्यायचा तर आम आदमीचं कसं व्हावं बरं? शेती परवडत नाही, मालाला भाव नाही असं म्हणून कसं चालेल बरं. आज फक्त दोन जिल्ह्यांनी तांदळाचा क्रॉप हॉलिडे घेतला, उद्या सारा आंध्रा क्रॉप हॉलिडे, परवा... नको नको, ती कल्पनाही नको.

आमचं दु:ख तुम्ही बरोबर ओळखलंत; पण खासगीत तुम्हाला आम्ही सांगतो, राव तुमचा उत्पादन खर्चाचा हिशेब चुकलाय. आम्ही जे आकडे प्रसिद्ध केले त्यावर तुम्ही विसंबून आहात. मुळात ग्यानबाची मेख तिथेच आहे. आम्ही आमच्या 'सोयीप्रमाणे' आकडेवारी जाहीर करतो; पण ती तद्दन खोटी आहे. आम्ही भले शेतकरी पुत्र आहोत; पण आम्ही फक्त 'जातीने' शेतकरी आहोत. प्रत्यक्षात आमचे हातपाय शेताला कधीच लागले नाहीत. आमचे चेलेचपाटे आकडेमोड करतात आमच्या इशाऱ्यावर एवढंच. आणखी एक सिक्रेट सांगतो पाध्येबुवा. आमचे स्वत:चे खासगी साखर कारखाने आहेत. ते मात्र मागाल ते भाव देऊनही फायद्यात चालतात; पण स्वाहाकार साखर कारखान्यांचं तसं नाही. सर्वांनाच माहीत असेलेले हे सिक्रेट केवळ तुम्हाला माहीत नाही म्हणून सांगतो झालं. आणखी एक सिक्रेट सांगतो. साखरेचा घरगुती खप मामुली आहे. खरा खप आहे तो बिस्कीट, गोळ्याचे कारखाने, मिठायांची दुकाने आणि औद्योगिक/संस्था यांच्यात. आम्हाला काळजी घ्यावी लागते ती त्यांची. अहो पाच वर्षांनी निवडणुका येतात, शिवाय जि.पं., पं.स, न.प., म.पा., स्वाहाकारी संस्था यांच्या निवडणुकांची सोय करायची असते ना!

बाकी तुम्ही त्या पॉश बाथरूमवाल्या कुणा शेतकऱ्यांनाच इंग्रजी लेखकांत दिलेला उदाहरण मात्र खतरा आहे बरं; पण तुम्हाला म्हणून आमचं सिक्रेट सांगतो. आमचे बहुतेक कार्यकर्ते शेतमालक या अर्थानं शेतकरीच आहेत आणि त्यांच्याही बाथरूम्स इटालियन मार्बल्सनी सजलेल्या आहेत. फक्त त्यांची शेती कशी काय पिकते हे मात्र कृपया विचारू नका. त्यांची शेती कुठे पिकते हे शेतकऱ्यांना माहीत आहे हीच तर आमची अडचण आहे. जमलं तर विदर्भ मराठवाड्यातल्याच नाही तर आंध्रातल्या सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या घरात चुकूनही डोकावून पाहू नका, असा आमचा तुम्हाला प्रामाणिक सल्ला आहे. नसता खरं तुम्हाला कळेल अन् तुम्ही तुमची लेखणी मोडून घ्याल.

बाय दी वे, याच महिन्याभरात विदर्भातल्या कापसाच्या अकरा शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची बातमी तुम्ही वाचलीत. नक्कीच ते तुमच्या भाषेतले 'दंडेली' असतील!

तुम्ही आंध्रातल्या पाणीवाल्या शेतकऱ्यांचं उदाहरण दिलंत. ते वाचून बरं वाटलं. चांगलं नाक ठेचलंत शेतकऱ्यांचं! जमीन पडित ठेवायचं म्हणतात. त्यांना हक्क तरी आहे का त्याचा? जमीन काय त्यांच्या बापाची आहे की काय? नाही ही भाषा जरा कडक झाली; पण तुमच्यापासून आम्हाला स्फूर्ती आली आहे. म्हणून हिंमत करून हा शब्द वापरला; पण गोऱ्या इंग्रजांच्या काळात असं मानलं जाई,

'खुल्क खुदा का, मुल्क बादशह का
हुकूमत अंग्रेजों की!'

नाही तरी आम्ही त्यांचेच वारसदार. आम्हाला नाहीतरी 'काळे इंग्रज' असं संबोधतातच ना! तेव्हा आम्ही शेतकऱ्यांना ठणकावून सांगू इच्छितो की, 'भूमी भगवानकी, मुल्क जनता का
पण हुकूमत काँग्रेस की!'

त्यामुळे आम्ही आता लवकरच एक कायदा करणार आहोत की, यापुढे जमीन पडिक ठेवली तर ती जमीन सरकार हिसकावून घेणार आणि मालकाला एक छदामही न देता जमीन कसवटीखाली घेणार. म्हणजे जमीनही आमची, पीकही आमचं, किंमतही आमची आणि भावही आम्हीच ठरवणार. बीपीएलच्या लोकांना आम्ही ते धान्य देणार आणि ते नुकसान भरून काढण्यासाठी बीपीएलच्या वरच्या लोकांना दसपट भावानं धान्य घ्यायला लावणार. म्हणजे एकाच फटक्यात शेतकरी आणि बुद्धिजीवी दोघांनाही मारणार; पण हे सारं सिक्रेट आहे बरं का! केवळ पाध्ये साहेब तुम्हाला सांगतो आहे!

पण एक अडचण आहे हो. शेतकऱ्यांची वाईट अवस्था वर्णन करणारी मुन्शी प्रेमचंदची गोदान ही कादंबरी गाजलेली आहे. तसंच मल्याळी भाषेतली 'कय्यर' हीही कादंबरी खूपच गाजलेली आहे. त्यातूनही शेतकऱ्यांच्या हालअपेष्टांचं खास वर्णन आलं आहे. अर्थात आमच्या दृष्टीने तुमच्या त्या इंग्रजी लेखकांचच निरीक्षण खरं असलं पाहिजे. आपल्या देशी लेखकांना कशाचंही भांडवल करायची सवयच आहे. तसं इंग्रजी लेखकांचं नाही- काही झालं तरी त्यांची कातडी गोरी अन् आपली काळी - तेव्हा त्यांचं म्हणणं अधिक खरं. उद्या कुणी तुम्हाला या दोन आणि इतर अनेक पुस्तकांचं उदाहरण दिलं तर तुम्ही उत्तर द्यायला तयार असावं एवढंच. बाकी ठीक!

- **बाबू सोंगाड्या**
babu.songadya@gmail.com

■■